• वर्ष : ०३ • अंक : ३२७ • पुणे • बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक





व्यसनमुक्तीसाठी सुभाष हगवणे यांचे कार्य प्रेरणादायी 3



चव्हाण यांच्याकडून प्रत्यक्ष बैठकीत थेट कानपिचक्या 4

## ठळक बातम्या

### पुण्यातील पर्यावरणाची स्थिती बिकट!

पुणे (आरंभ पर्व) : 'विकासाच्या नावाखाली शहरात वाढत चाललेली सिमेंट काँक्रिटची जंगले, सांडपाण्यावर प्रक्रिया न करता बिनदिक्कतपणे नदीत सोडले जाणारे सांडपाणी, ओला आणि सुका कचऱ्याचे न होणारे वर्गीकरण आणि वर्षानुवर्षे दिली जाणारी आश्वासने यामुळे शहरातील पर्यावरणाची स्थिती बिघडत असून, प्रशासनाने वेळीच सावध व्हावे, अन्यथा वेळ निघून गेलेली असेल,' अशा शब्दांत सर्वपक्षीय नगरसेवकांनी बिघडलेल्या पर्यावरणाच्या स्थितीबाबत महापालिका प्रशासनाला सुनावले. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत पर्यावरणाच्या सद्य:स्थितीच्या अहवालावर नगरसेवकांनी तीव्र आक्षेप नोंदवल. हवा, ध्वनी प्रदूषणात होणारी वाढ, टेकड्यांवरील वाढते बांधकाम, ओढे-नाल्यांमध्ये टाकला जाणारा राडारोडा, नदी प्रदूषण, वृक्षतोड अशा विविध प्रश्नांवर सभासदांनी प्रशासनाला जाब विचारला. प्रशासनाने तयार केलेला पर्यावरण अहवाल चकचकीत असला, तरी प्रत्यक्षात पुण्याची परिस्थिती अतिशय गंभीर असल्याचे वास्तव नगरसेवकांनी मांडले. केवळ विकसित पुणे नव्हे, तर राहण्यालायक पुणे तयार करणे अधिक गरजेचे आहे, अशी अपेक्षा नगरसेवकांनी व्यक्त केली.

### रस्त्यावर वाहन पार्क केल्यास थेट जप्ती

पिंपरी (आरंभ पर्व) : चाकणमध्ये जाणाऱ्या ट्रक रस्त्यावर उभ्या केल्या जात असल्याने रस्त्याच्या दोन मार्गिकांवरील वाहतूक बंद होते. एमआयडीसीच्या मोकळ्या, गायरान जागा पार्किंगसाठी वापरण्यात येणार आहेत. शुक्रवारपासून (२१ ऑगस्ट) दुचाकीपासून कोणतेही वाहन रस्त्यावर उभे केल्यास जप्त केले जाणार आहे. पोलिसांना एमएसएफचे शंभर जवान दिले जाणार आहे. दोन पाळ्यांमध्ये जवान आणि पोलीस वाहतुकीचे नियमन करणार असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले. एमआयडीसी परिसरातील उपलब्ध मोकळ्या जागांचा पार्किंगसाठी वापर करण्यात येणार असून, तळेगावपासून भंडारा डोंगर परिसरापर्यंत उपलब्ध जागांचा नियोजनबद्ध वापर केला जाणार आहे.

### हिंजवडी आयटीएन्सची व्यथा

पिंपरी (आरंभ पर्व) : हिंजवडी आयटी पार्कमध्ये सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी फेज १ ते फेज ३ या अवघ्या दीड ते दोन किलोमीटर रस्त्याच्या अंतरासाठी तब्बल दीड तासाचा अवधी लागतो. प्रचंड वाहतुक कोंडी आणि रस्त्यावरील खड्डे यामुळे या रस्त्यावरील रूग्णालयात एखाद्या रूग्णाला न्यायचे असल्यास रूग्णालयापर्यंत रूग्ण पोहोचू शकणार नाही, अशी दयनीय अवस्था असल्याची व्यथा परिसरातील आयटीएन्स आणि सोसायटीधारकांनी शिवसेना (ठाकरे) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांच्यासमोर मांडली.

# दहा वर्षांच्या मुलीवर अत्याचार करून खून

## मुलीच्या शोधकार्यात पोलिसांबरोबर सहभागी झालेला आरोपी अटकेत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे दहा वर्षांच्या मुलीचा लैंगिक अत्याचार करून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी २५ वर्षीय आरोपीला आळेफाटा पोलिसांनी अटक केली आहे. मुलीचा शोध घेत असल्याचे भासवत तो पोलिसांबरोबर फिरत होता. मात्र, त्याच्या संशयास्पद हालचालींवरून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्यानंतर या गंभीर गुन्ह्याचा उलगडा झाला.

मुलगी चौथीत शिकत होती. ती आजारी असल्याने मंगळवारी शाळेत गेली नव्हती. दुपारच्या सुमारास घरात पालक नसल्याची संधी साधून संशयित आरोपीने तिच्यावर अत्याचार केल्याचा पोलिसांचा संशय आहे. त्यानंतर मुलगी घरात दिसून न आल्याने कुटुंबीय, नातेवाईक आणि ग्रामस्थांनी तिचा सर्वत्र शोध सुरू केला. मात्र, बराच वेळ शोध घेऊनही मुलगी आढळून न



आल्याने आळेफाटा पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली.

मुलीचा शोध सुरू असताना संशयित आरोपीही पोलीस आणि ग्रामस्थांसोबत शोधकार्यात सहभागी झाला होता. मात्र, त्याच्या वर्तनाबाबत पोलिसांना संशय आल्याने त्याला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्याने दाखविलेल्या 'लेंडे स्थळ' परिसरातील एका ओढ्याजवळ झाडाशेजारी मुलीचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप गिल, उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील तसेच पोलिस निरीक्षक विश्वास जाधव यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळाची बारकाईने पाहणी करून आवश्यक पुरावे संकलित केले. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून, त्याचा अहवाल आल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण आणि गुन्ह्याशी संबंधित अन्य बाबी स्पष्ट होणार आहेत.

या घटनेने जुन्नर तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे. मुलीवर अत्याचार करून तिची हत्या करणाऱ्या आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करावी, तसेच या प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवून आरोपीला कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी ग्रामस्थ आणि नातेवाईकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास आळेफाटा पोलिसांकडून सुरू आहे. जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना अत्यंत दुर्दैवी व धक्कादायक आहे. यासंदर्भात पुणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधून तपासाचा आढावा घेतला.

## ८२ कोटी ४० लाखांच्या ठेवी जप्त; ठेवीदारांना मोठा दिलासा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'व्हेलिंटिना मेगाकॉर्प'मध्ये या खासगी वित्तीय संस्थेत ठेवीदारांनी गुंतवलेली ८२ कोटी ४० लाख रुपयांच्या ठेवी जप्त केल्या आहेत. न्यायालयाच्या आदेशाने या ठेवी सुरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी या बाबतचे आदेश दिले. गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणूक केल्याप्रकरणी 'व्हेलिंटिना मेगाकॉर्प'चे संचालक संतोष नाथा बांदल (रा. सॅलिसबरी पार्क, गुलटेकडी), ज्ञानेश्वर अनंत चोरगे (रा. लेकटाऊन सोसायटी, बिबवेवाडी) यांच्यासह संचालकांविरुद्ध अलंकार पोलीस ठाण्यात १८ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. अनियंत्रित ठेव योजना प्रतिबंध अधिनियम २०१९ अन्वये ही कारवाई करण्यात आली आहे. 'व्हेलिंटिना मेगाकॉर्प'ने ठेवीदारांना गुंतवणुकीचे आमिष दाखविले होते. ठेवीदारांकडून ४३ कोटी रुपयांच्या ठेवी स्वीकारल्या होत्या. प्राथमिक तपासात दोन हजार ८००



जणांची फसवणूक केल्याची शक्यता आहे. ठेवीदार हे कंपनीचे भागीदार आहेत. त्यांनी रक्कम गुंतविली होती, असा दावा कंपनीच्या संचालकांनी केला होता. ठेवीदारांनी गुंतविलेली रक्कम सुरक्षित ठेवण्यासाठी रक्कम जप्त करून ती सुरक्षित ठेवण्यात आली आहे. ही रक्कम न्यायालयाच्या ताब्यात राहणार आहे. 'व्हेलिंटिना'चे कार्यालय कर्वे रस्त्यावरील सक्सेस टॉवरमध्ये आहे. कंपनीच्या विविध बँक खात्यातील ८२ कोटी ४० लाख ६१ हजार २६० रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून करण्यात येत आहे.

## तिकिट विक्री केंद्रात रेल्वे कर्मचाऱ्यावर चाकूने वार करून रोकड लुटली

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारातील तिकिट विक्री केंद्रातील कर्मचाऱ्यावर चाकूने वार करून चोरट्यांनी रोकड लुटल्याची धक्कादायक घटना मंगळवारी मध्यरात्री घडली. चोरट्यांनी चाकूने वार केल्याने रेल्वे कर्मचारी जखमी झाला असून, पसार झालेल्या चोरट्यांचा शोध घेण्यात येत आहे. चोरट्यांनी रेल्वे कर्मचाऱ्याच्या गळ्यातील सोनसाखळी, मोबाइल संच; तसेच तिकिट विक्रीतून जमा झालेली २६ हजार रुपयांची रोकड, असा चार लाख ९१ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटून नेला. केल्विन सोलोमन मायला (वय २९, रा. धायरकर कॉलनी, मुंढवा) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. याबाबत केल्विन यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी



दिलेल्या माहितीनुसार, केल्विन पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारातील तिकिट केंद्रात नियुक्तीस आहेत. मंगळवारी (१८ ऑगस्ट) मध्यरात्री एकच्या सुमारास केल्विन तिकिट विक्री केंद्रात जमा झालेली रोकड घेऊन मुख्य कार्यालयात जमा करण्यासाठी निघाले होते. त्या वेळी दोन चोरट्यांनी त्यांना तिकिट विक्री केंद्राजवळ अडवले. त्यांच्या गळ्याला चाकू लावून, त्यांना तिकिट विक्री केंद्रात जाण्यास सांगितले. त्यांना मारहाण केली. केल्विन यांनी चोरट्यांना विरोध केला. झटापटीत चोरट्यांनी त्यांच्या हातावर चाकूने वार केला.

## पुणे महापालिकेच्या कारभाराविरोधात राष्ट्रवादी आक्रमक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था, सर्वत्र पडलेले खड्डे, मुळा-मुठा नदीपात्रातील तसेच कात्रज तलावातील जलपर्णी काढण्याच्या टेंडरमधील कथित अनियमितता बाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)च्या वतीने सोमवारी पुणे महानगरपालिके समोर जोरदार निदर्शने करण्यात आली.

शहराध्यक्ष श्रीकांत पाटील आणि महापालिका गटनेते काकासाहेब चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी महापालिका प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या कारभाराविरोधात घोषणाबाजी करत विविध मागण्या मांडल्या. गेल्या काही महिन्यातील पावसामुळे पुणे शहरातील प्रमुख तसेच अंतर्गत रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यांची चाळण झाली असून, नागरिक आणि वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. खड्ड्यांमुळे




अपघातांचा धोका वाढला असून, महापालिका प्रशासनाने तातडीने खड्डे बुजवून रस्त्यांची कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. मुळा-मुठा नदीपात्रातील आणि कात्रज तलावातील जलपर्णी काढण्यासाठी करण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या टेंडरवरही यावेळी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मुसळधार पावसामुळे नदीपात्रातील मोठ्या प्रमाणात जलपर्णी नैसर्गिकरीत्या वाहून गेल्यानंतरही जलपर्णी काढण्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या कामाला घाईघाईने मंजुरी देण्यात आल्याचा आरोप राष्ट्रवादीकडून करण्यात आला. या संपूर्ण प्रक्रियेची पारदर्शक चौकशी करून संबंधित टेंडर रद्द करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. दरम्यान शहरातील मूलभूत प्रश्न प्रलंबित असताना नामांतराच्या मुद्द्यांना प्राधान्य देण्याची गरज काय, असा सवाल यावेळी उपस्थित केला. महापालिका प्रशासनाने तातडीने शहरातील खड्डे बुजवावेत, जलपर्णी काढण्याच्या टेंडर प्रक्रियेची चौकशी करून टेंडर रद्द करावे आणि महापौर निवासस्थानाच्या नामांतराचा निर्णय मागे घ्यावा, अशी जोरदार मागणी करण्यात आली. या मागण्यांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास आगामी काळात यापेक्षा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शहराध्यक्ष श्रीकांत पाटील यांनी दिला. या आंदोलनात पुणे शहर महिला अध्यक्षा स्वाती पोकळे, नगरसेवक गफूर भाई पठाण, नगरसेविका अनिता इंगळे, युवक अध्यक्ष किशोर कांबळे, सामाजिक न्याय यांच्यासह विविध सेलचे अध्यक्ष, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

> पुणेकरांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून महापालिका प्रशासन केवळ दिखाऊ निर्णयांमध्ये व्यस्त आहे. शहरातील खड्डे, रस्त्यांची दुरवस्था आणि जलपर्णींच्या टेंडरमधील कथित अनियमितता याची तातडीने चौकशी झाली पाहिजे. जनतेच्या पैशांचा अपव्यय आम्ही कदापि सहन करणार नाही. प्रशासनाने तातडीने कार्यवाही केली नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने यापेक्षा तीव्र आंदोलन उभारले जाईल."
>
> **- काकासाहेब चव्हाण, गटनेते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार**

# रस्ते व ड्रेनेज दुरुस्ती कामांना द्या

## पुणे महानगरपालिकेच्या महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांच्या सूचना

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील रस्ते, ड्रेनेज व्यवस्था आणि मूलभूत नागरी सुविधांच्या समस्यांची गंभीर दखल घेत पुणे महानगरपालिकेच्या महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांनी संबंधित विभागांना रस्ते व ड्रेनेजची कामे तातडीने हाती घेऊन त्यांना गती देण्याच्या सूचना दिल्या आहेत.

नवीन समाविष्ट गावांमध्ये अनेक ठिकाणी रस्त्यांची अवस्था खराब असून काही ठिकाणी रस्ते अपूर्ण आहेत. तसेच ड्रेनेजची अपुरी व्यवस्था, पावसाळ्यात रस्त्यांवर साचणारे पाणी, चिखल आणि वाहतुकीस निर्माण होणारे अडथळे यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेबरोबरच दैनंदिन वाहतुकीचा प्रश्नही गंभीर बनत आहे. या पार्श्वभूमीवर म्हाळुंगे गावासह



सर्व नवीन समाविष्ट गावांतील प्रमुख रस्ते, अंतर्गत रस्ते तसेच ड्रेनेज व्यवस्थेची स्थळनिहाय पाहणी करून आवश्यक दुरुस्तीची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत, अशा स्पष्ट सूचना महापौर मंजुषाताई नागपुरे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. "नवीन समाविष्ट गावांतील नागरिकांनाही पुणे शहरातील इतर भागांप्रमाणे दर्जेदार मूलभूत नागरी सुविधा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. रस्ते आणि ड्रेनेजसारख्या अत्यावश्यक सुविधांच्या कामांमध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून कामांना गती द्यावी," असे महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांनी सांगितले.

तसेच संबंधित विभागांनी प्रत्येक नवीन समाविष्ट गावातील रस्ते व ड्रेनेजच्या समस्यांचे स्थळनिहाय सर्वेक्षण करून कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करावा, आवश्यक निधी व मनुष्यबळाचे नियोजन करावे आणि पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तातडीच्या कामांना प्रथम प्राधान्य द्यावे, असेही महापौरांनी निर्देशित केले आहे.

रस्त्यांची दुरुस्ती करताना केवळ तात्पुरती डागडुजी न करता दर्जेदार व टिकाऊ कामे करण्यात यावीत, तसेच ड्रेनेज व्यवस्थेतील अडथळे दूर करून पावसाचे पाणी साचणार नाही, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, असेही महापौरांनी स्पष्ट केले.

नवीन समाविष्ट गावांचा नियोजनबद्ध आणि सर्वसमावेशक विकास हा महापालिकेच्या प्राधान्यक्रमाचा भाग असून, नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न तातडीने सोडवण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने आणि वेळबद्ध पद्धतीने काम करावे, अशी भूमिका महापौरांनी व्यक्त केली.



## थोडक्यात पण महत्वाचे

### मोबएव्हेन्यू एआय टेकच्या महसुलात ५६.९ टक्के वाढ



मुंबई (आरंभ पर्व) : मोबएव्हेन्यू एआय टेक लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२७च्या पहिल्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीत कंपनीचा महसूल ५६.९ टक्क्यांनी वाढून ७२.८ कोटी रुपये झाला. करानंतरचा नफा जवळपास दुप्पट होऊन ११.७ कोटी रुपयांवर पोहोचला, तर व्याज, कर, घसारा आणि कर्जखर्चापूर्वीचा नफा ७७ टक्क्यांनी वाढून १५.४ कोटी रुपये झाला. या नफ्याचे प्रमाण २१.२ टक्के राहिले. महसुलाच्या तुलनेत नफ्यात अधिक वेगाने वाढ झाल्याने कंपनीच्या कार्यक्षमतेत सुधारणा झाल्याचे दिसून आले. सॉफ्टवेअरवर आधारित व्यवसाय पद्धतीमुळे खर्चात त्याच प्रमाणात वाढ न करता व्यवसायाचा विस्तार करणे कंपनीला शक्य झाले. क्विक कॉमर्स, बँकिंग-वित्तीय सेवा-विमा, वित्तीय तंत्रज्ञान आणि किरकोळ विक्री यांसारख्या वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांतील थेट जाहिरातदारांकडून मिळालेली मागणी तसेच पुनर्विक्रेता आणि जाहिरात संस्थांच्या माध्यमातून मिळालेले जागतिक ग्राहक ही कंपनीच्या वाढीची प्रमुख कारणे ठरली. एकूण महसुलात थेट ग्राहकांचा वाटा ६५.२ टक्के राहिला.

### आईकू जेड ११ विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा नवा अनुभव देणार




नवी दिल्ली (आरंभ पर्व) : उच्च कार्यक्षमतेच्या स्मार्टफोनसाठी ओळखल्या जाणाऱ्या आईकू कंपनीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून आपला नवीन आईकू जेड ११ स्मार्टफोन सादर करण्याची घोषणा केली आहे. हा स्मार्टफोन २० ऑगस्ट रोजी भारतीय बाजारपेठेत दाखल होणार असून, त्याची किंमत ४० हजार रुपयांपेक्षा कमी असणार आहे. अभ्यास, टिपणे तयार करणे, मजकूर निर्मिती, माहिती शोधणे आणि एकाच वेळी अनेक कामे करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा स्मार्टफोन विशेषतः तयार करण्यात आला आहे. अधिक वेगवान आणि अधिक हुशार कृत्रिम बुद्धिमत्तेचा अनुभव देण्याच्या उद्देशाने त्याची रचना करण्यात आली आहे. आईकू जेड ११ मध्ये विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन अनेक कृत्रिम बुद्धिमत्ता सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यातील 'एआय कॅप्शन्स' सुविधा गूगल जेमिनी आणि मायक्रोसॉफ्ट अझूर या तंत्रज्ञानांना एकत्रित करून जलद आणि अचूक ध्वनीचे लिखित रूपांतर तसेच भाषांतर करण्यास मदत करते.



### ईशान इंटरनॅशनल स्कूलमध्ये ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

धायरी (आरंभ पर्व) : ईशान इंटरनॅशनल स्कूल व गुरुकुल प्राथमिक विद्यालय, धायरी यांच्या वतीने भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीपर सादरीकरणे तसेच सामाजिक विषयांवर आधारित प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी विद्यार्थ्यांनी नुकत्याच दिल्लीतील जंतरमंतर येथे झालेल्या आंदोलनाची चुणूक आपल्या प्रात्यक्षिकातून दाखवून दिली. विद्यार्थ्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न, विद्यार्थ्यांचा आवाज आणि आपल्या मागण्या लोकशाही मार्गाने मांडण्याची भूमिका प्रभावीपणे सादर केली. दिल्लीतील आंदोलनाचे प्रतिबिंब विद्यार्थ्यांच्या मनावरही उमटल्याचे या सादरीकरणातून दिसून आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे लेखक अरुण यावलीकर, ॲड. राजेश मुंडे, सुरेशभाऊ पोकळे, गोकुळ रायकर, लक्ष्मण साबळे, पत्रकार भाऊसाहेब पोकळे, बाळकृष्ण वांजळे यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव मते पाटील, बाळासाहेब मंडलिक, गोकुळ रायकर, संचालक मंडळ व सर्व कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला. पालकवर्गानेही मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. देशभक्ती, संस्कार, शिक्षण आणि सामाजिक जाणीवेचा सुंदर संगम घडविणारा हा स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम ठरला.

# अलिशान चारचाकी वाहनातून अग्नीशस्त्रे बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगारांना अटक



## दोन पिस्तूलांसह तीन जिवंत काडतुसे जप्त

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंगदरम्यान कारवाई करत अलिशान फॉर्च्युनर वाहनातून अग्नीशस्त्रे घेऊन फिरणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दोन पिस्तूल, तीन जिवंत काडतुसे आणि फॉर्च्युनर वाहन असा एकूण ६ लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई दि. १० ऑगस्ट २०२६ रोजी नऱ्हे पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक विजयसिंह घाडगे व पथक गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करीत असताना त्यांना गोपनीय बातमीदारामार्फत संशयित व्यक्ती अग्नीशस्त्रांसह चारचाकी वाहनातून फिरत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने पारी कंपनी चौक ते उंबऱ्या गणपती चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर, अयोध्या प्युअर व्हेज, बेनकर वस्ती, धायरी परिसरात पाहणी केली. यावेळी रस्त्याच्या कडेला एमएच १४ सीके ०००४ क्रमांकाची फॉर्च्युनर गाडी संशयास्पदरीत्या थांबलेली आढळली. पोलिसांनी गाडीची पाहणी करून त्यातील दोन इसमांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी आपली नावे शुभम ऊर्फ सोनू अनिल शिंदे (वय २६, रा. महर्षी नगर, स्वारगेट, पुणे) आणि अथर्व ऊर्फ आप्पा उमाकांत सणस (वय २३, रा. गुरुवार पेठ, पुणे) अशी सांगितली.

पंचासमक्ष दोघांची अंगझडती तसेच वाहनाची तपासणी केली असता वाहनाच्या आर्मरेस्टजवळ एक पिस्तूल व त्याच्या मॅगझिनमध्ये एक जिवंत काडतूस आढळून आले. पोलिसांनी हे अग्नीशस्त्र व काडतूस जप्त केले. तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली फॉर्च्युनर गाडीही जप्त करण्यात आली. त्यानंतर आरोपींना पोलीस कोठडी मिळाल्यानंतर पोलिसांनी कौशल्यपूर्ण तांत्रिक तपासाच्या आधारे अधिक चौकशी केली. या तपासातून आणखी एक पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. अशा प्रकारे दोन्ही आरोपींकडून दोन पिस्तूल, तीन जिवंत काडतुसे आणि फॉर्च्युनर वाहन असा एकूण ६ लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विजयसिंह घाडगे करीत आहेत.

ही कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, पोलीस उपायुक्त डॉ. सागर कवडे, सहायक पोलीस आयुक्त विजय कुंभार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक वर्षा देशमुख आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) ईश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजयसिंह घाडगे तसेच पोलीस अंमलदार पांडुरंग पवार, निलेश भोरडे, प्रणिल मेस्त्री, देवा चव्हाण, सुनील चव्हाण, कार्तिक कोंडे, राजू तोरे, नितीन वाघमारे, धुळा गारळे, गोविंदराव कपाटे, स्वप्नील सूर्यवंशी व सुमित जगझाप यांच्या पथकाने केली.

## मोठ्या कार्यालयीन व्यवहारांचे पुण्याच्या बाजारपेठेवर वर्चस्व कायम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्याच्या कार्यालयीन जागांच्या बाजारपेठेत मोठ्या आकाराच्या कार्यालयीन व्यवहारांचे वर्चस्व कायम असून, २०२६च्या पहिल्या सहामाहीत शहरातील एकूण कार्यालयीन भाडेपट्टा व्यवहारांपैकी ५७ टक्के वाटा मोठ्या आकाराच्या कार्यालयीन जागांचा राहिला आहे. नाईट फ्रँक इंडियाच्या अहवालानुसार, २०२६च्या पहिल्या सहामाहीत पुण्यातील एकूण कार्यालयीन भाडेपट्टा व्यवहार ६.६ दशलक्ष चौरस फुटांवर पोहोचले असून, मागील वर्षाच्या तुलनेत त्यात जवळपास ३० टक्क्यांची वाढ झाली आहे. एक लाख चौरस फुटांपेक्षा अधिक आकाराच्या कार्यालयीन जागांच्या भाडेपट्ट्यात वार्षिक तुलनेत ३३ टक्क्यांची वाढ झाली. २०२५च्या पहिल्या सहामाहीत

- **पहिल्या सहामाहीत ५७ टक्के वाटा**

या विभागात २.८ दशलक्ष चौरस फुटांचे व्यवहार झाले होते. यंदाच्या पहिल्या सहामाहीत हे प्रमाण वाढून ३.८ दशलक्ष चौरस फुटांवर पोहोचले आहे. मोठ्या आकाराच्या कार्यालयीन व्यवहारांमध्ये झालेल्या या वाढीमुळे पुण्यातील एकूण कार्यालयीन भाडेपट्टा व्यवहारांनाही मोठी चालना मिळाली.

२०२५च्या पहिल्या सहामाहीतील ५.१ दशलक्ष चौरस फुटांच्या तुलनेत यंदाच्या पहिल्या सहामाहीत एकूण व्यवहार ६.६ दशलक्ष चौरस फुटांवर पोहोचले. त्यामुळे पुण्याच्या कार्यालयीन बाजारपेठेवरील भाडेकरूंचा विश्वास कायम असल्याचे स्पष्ट होत आहे.

## डॉ. जनार्दन भोसले यांना लूशियाना विद्यापीठाची मानद डी.लिट. पदवी

### मराठी साहित्य, पत्रकारिता, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील बहुआयामी कार्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मराठी साहित्य, पत्रकारिता, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे कवी, साहित्यिक, अभ्यासक, पत्रकार व समाजसेवक डॉ. जनार्दन भोसले यांना अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ लूशियाना यांच्या वतीने 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' (D.Litt.) ही मानद पदवी प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या बहुआयामी कार्याची आंतरराष्ट्रीय शैक्षणिक क्षेत्राने घेतलेली दखल म्हणून या सन्मानाकडे पाहिले जात आहे.




पुणे हे देशातील महत्त्वाचे शैक्षणिक व सांस्कृतिक केंद्र म्हणून ओळखले जाते. याच पुण्यभूमीत झालेल्या या गौरवामुळे डॉ. भोसले यांच्या साहित्यिक आणि सामाजिक कार्याला विशेष प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. आयपीएस अधिकारी तसेच काश्मीरमधील शास्त्रज्ञ आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना डी.लिट. पदवीने सन्मानित करण्यात आले. भारत-पाकिस्तान फाळणीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या 'निधर्मीवाद' या समीक्षात्मक ग्रंथाची महाराष्ट्राच्या साहित्यविश्वात विशेष दखल घेण्यात आली. या पुस्तकाला २५ राज्यस्तरीय पुरस्कार आणि दोन राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्याचे सांगण्यात येते. त्यांच्या संशोधनपर लेखनाबरोबरच काव्यनिर्मितीलाही विविध स्तरांवर गौरविण्यात आले असून, त्यांच्या साहित्यिक कार्याला व्यापक मान्यता मिळाली आहे. साहित्याबरोबरच डॉ. भोसले यांचे सामाजिक कार्यही उल्लेखनीय आहे. 'दारू सोडवा अभियान' राबवून व्यसनमुक्तीचा संदेश देण्याचे काम ते करीत आहेत. तंबाखूजन्य पदार्थ व गुटख्याच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी तरुणांमध्ये जनजागृती करून त्यांना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन ते करतात.

साहित्य, भाषा, संशोधन, पत्रकारिता, सामाजिक प्रबोधन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील या बहुआयामी योगदानाचा विचार करून डॉ. जनार्दन भोसले यांना 'मानद डॉक्टर ऑफ लिटरेचर इन मराठी' (D.Litt.) या सन्मानाने गौरविण्यात आले.

## कौशल्याधारीत शिक्षण ग्रामीण भागापर्यंत पोहोचवा

### चंद्रकांत पाटील यांचे शिक्षण संस्थांना आवाहन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सध्याच्या काळात कौशल्य विकासाला अत्यंत महत्त्व असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कौशल्य आधारित शिक्षण प्रशिक्षण देण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. त्यासाठी असा संस्थांना शासनाकडून आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी च्या कुलपती पदावर डॉ. स्वाती मुजुमदार यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, सिंबायोसिसचे अध्यक्ष डॉ. शां ब मुजुमदार, सौ. संजिवनी मुजुमदार आदि मान्यवर उपस्थित होते. सध्याच्या काळात संपूर्ण जगात कौशल्य आत्मसात करण्याला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. कौशल्य प्राप्त झालेली युवा पिढी स्वतःचा आणि पर्यायने समाजाचा व देशाचा विकास घडवू शकते. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत कौशल्य शिक्षण पोहोचविण्यासाठी शिक्षण संस्थांनी पुढाकार घ्यावा. त्यांना शासनाकडून सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा आणि प्रोत्साहन पर योजना उपलब्ध करून दिल्या जातील, असे चंद्रकांत पाटील यांनी यावेळी सांगितले.

डॉ स्वाती मुजुमदार यांनी कौशल्य विकासासाठी आणि कौशल्य प्रशिक्षणासाठी जागतिक पातळीवर मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली सिंबायोसिस कौशल्य विकास आणि व्यवसाय प्रशिक्षण विद्यापीठ मोठी झेप घेईल, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला. महाराष्ट्राला कौशल्य विकास व प्रशिक्षण यामध्ये अग्रेसर स्थान प्राप्त करून देण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वप्न सिंबायोसिस आणि मुजुमदार परिवाराने पूर्ण केले आहे. भविष्यात सिंबायोसिस कौशल्य व व्यावसायिक शिक्षण विद्यापीठ जगातील कौशल्य विकासाचे महत्त्वाचे केंद्र ठरेल, असा विश्वास मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केला. इंग्रजांनी भारतात सुरू केलेली शिक्षण पद्धती आजही अमलात आणली जात आहे. मात्र, सध्याच्या काळात कौशल्य विकासाला प्राप्त झालेले महत्त्व लक्षात घेऊन सिंबायोसिसने कौशल्य विकासासाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना केली. कौशल्य विकास व प्रशिक्षण क्षेत्रात भारत अग्रेसर राहावा यासाठी केंद्र व राज्य शासनाने पुढाकार घेतला पाहिजे, अशी अपेक्षा डॉ. मुजुमदार यांनी व्यक्त केली. गतिमान व प्रगतिशील राजकीय नेतृत्व प्राप्त झाले तर मोठ्या गोष्टी साध्य करणे शक्य होते. सिंबायोसिस कौशल्य विकास व व्यवसाय प्रशिक्षण विद्यापीठ हे त्याचे उदाहरण आहे, असे डॉ. स्वाती मुजुमदार यांनी नमूद केले. तत्कालीन शिक्षण मंत्री विनोद तावडे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा या विद्यापीठाच्या उभारणीत मोठा वाटा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## वर्टस फुटबॉल अकॅडमी तरुणाईला नवी दिशा देईल : प्रशांत जगताप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून वडगाव शेरी येथील विद्यांकुर स्कूलच्या प्रांगणात वर्टस फुटबॉल अकॅडमीचे दिमाखदार उद्घाटन करण्यात आले. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या युनिटी फुटबॉल कप २०२६ स्पर्धेलाही तरुण खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. माजी आमदार मोहन जोशी यांनी वर्टस फुटबॉल अकॅडमीचे कौतुक करताना, ही अकॅडमी तरुणाईला, विशेषतः जेन-झी पिढीला क्रीडा, शिस्त आणि सकारात्मक विचारांची मोठी प्रेरणा देईल, असा विश्वास व्यक्त केला. या संपूर्ण उपक्रमामध्ये वर्टस फुटबॉल अकॅडमीचे संस्थापक प्रशांत (लुकस) केदारी यांची भूमिका विशेष ठरली. सामाजिक, क्रीडा, कला आणि साहित्य क्षेत्राशी जोडलेले प्रशांत केदारी यांचे नेतृत्व आणि तरुणांसाठी काहीतरी भरीव करण्याची धडपड यावेळी मान्यवरांनी




अधोरेखित केली. युवा नेते अविनाश बागवे यांनीही त्यांच्या नेतृत्वाचे कौतुक करत वर्टस अकॅडमीच्या ध्येयधोरणाला शुभेच्छा दिल्या. उद्घाटनप्रसंगी काँग्रेस पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, माजी नगरसेवक अविनाश बागवे, माजी नगरसेवक राजेंद्र शिरसाठ, सुनील मलके, फादर ॲलेक्स, राहुल डबाळे, सत्यवान गायकवाड, महिला संघटक प्रतिमा केदारी,पीटर जॉर्ज, जॉन रूपवते, पुणे फूटबॉल असोसिएशन चे प्रदीप परदेशी, जॉय जोस, संजय गायकवाड,विमान नगर पोलीस स्टेशनचे पीआय अशोक शिरसाठ, रिफेन्स अल्फान्सो आदी मान्यवर उपस्थित होते.

# जागृत नागरिकच लोकशाहीचे खरे रक्षक!

## लोकप्रतिनिधींच्या जबाबदारीची जाणीव आणि नागरिकांच्या कर्तव्याचा विचार

*लोकशाहीमध्ये अंतिम सत्ता ही जनतेची असते. जनता आपल्या मतांच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी निवडते, त्यांच्यावर विश्वास ठेवते आणि आपल्या परिसरातील मूलभूत समस्या सोडविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवते. परंतु आज अनेक ठिकाणी चित्र याच्या अगदी उलट दिसत आहे. लोकप्रतिनिधींनी करावयाची कामे आता सामान्य नागरिकांना स्वतः पुढाकार घेऊन करावी लागत आहेत. ही परिस्थिती लोकशाहीसाठी निश्चितच चिंताजनक आहे.*


• शब्दांकन •

नितीन घोलप नऱ्हे, पुणे

96373 78572


**(दै. आरंभ पर्व)**

आमच्या परिसरात पाणीपुरवठा अपुरा होणे, ड्रेनेजच्या समस्या वारंवार निर्माण होणे, वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था, खड्डे, सार्वजनिक दिवे बंद असणे, सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत नसणे, पावसाळी गटारे वेळेवर साफ न होणे, स्वच्छतेचा अभाव, डासांची वाढ, सार्वजनिक आरोग्य सुविधा आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी अशा अनेक समस्या वर्षानुवर्षे कायम आहेत. या समस्या सोडविण्याची जबाबदारी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची असताना, नागरिकांनाच अर्ज, पाठपुरावा, पुरावे, बैठका आणि कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत.

आश्चर्याची बाब म्हणजे, अनेक वेळा नागरिकांच्या जनहिताच्या मागण्यांना पाठिंबा देण्याऐवजी काही लोकप्रतिनिधी संबंधित कार्यालयांमध्ये जाऊन विकासकामांना विरोध करत असल्याच्या चर्चा ऐकायला मिळतात. "यांना रस्ता देऊ नका", "काम झाले तर आमचे नाव पुढे यायला हवे", अशा मानसिकतेमुळे विकासाला अडथळे निर्माण होतात. जनतेच्या प्रश्नांचे समाधान करण्याऐवजी श्रेयवादाचे राजकारण वाढू लागले, तर त्याचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांनाच बसतो.

लोकप्रतिनिधींनी एक गोष्ट कायम लक्षात ठेवली पाहिजे की, ते जनतेचे मालक नाहीत; ते जनतेचे प्रतिनिधी आणि सेवक आहेत. त्यांना मिळणारा मान, अधिकार आणि निधी हा जनतेच्या विश्वासामुळे आणि जनतेने भरलेल्या करातूनच उपलब्ध होतो. त्यामुळे सार्वजनिक निधी हा कोणत्याही व्यक्तीचा किंवा पक्षाचा नसून तो जनतेचा आहे. त्या निधीतील प्रत्येक रुपयाचा योग्य वापर झाला का, कामाचा दर्जा कसा आहे, काम वेळेत पूर्ण झाले का, हे विचारण्याचा पूर्ण अधिकार नागरिकांना आहे.

निवडणुकीच्या काळात प्रत्येक मतदारसंघात मोठमोठे फलक झळकतात. "कामाचा माणूस", "जनतेचा आवाज", "अर्ध्या रात्री धावून येणारा नेता", "दमदार नेतृत्व", "युवा नेता", "भाऊ", "दादा", "अण्णा", "आप्पा", "काका", "मामा" अशा अनेक विशेषणांनी वातावरण रंगवले जाते. मात्र निवडणूक संपल्यानंतर अनेकांना जनतेच्या समस्या विसर पडतो. त्याच वेळी नागरिकांच्या संयमाची खरी परीक्षा सुरू होते. आज सोशल मीडियाचे युग आहे. एखादा खड्डा बुजवला, एखादे ड्रेनेज साफ केले, एखादा स्पीड ब्रेकर तयार केला किंवा थोडी साफसफाई झाली की त्याचे मोठे फोटोशूट, बॅनर, रील्स आणि स्टेटस तयार होतात. प्रत्यक्षात ही कामे प्रशासनाची नियमित जबाबदारी आहेत. त्यासाठी जनतेवर उपकार केल्याप्रमाणे प्रसिद्धी करण्यापेक्षा अशी कामे नियमित आणि दर्जेदार होणे अधिक महत्त्वाचे आहे.

सार्वजनिक शौचालय, बसथांबे, रस्ते, बागा, शाळा, रुग्णालये, पाणीपुरवठा व्यवस्था, गटारे, पथदिवे आणि इतर सार्वजनिक सुविधा या सर्व नागरिकांच्या मालकीच्या आहेत. त्यामुळे त्यांची काळजी घेणे ही केवळ प्रशासनाचीच नव्हे तर नागरिकांचीही जबाबदारी आहे. मात्र नागरिकांनी जबाबदारी पार पाडताना प्रशासनालाही त्याच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून दिली पाहिजे.

आपल्या भागात पिण्याचे पाणी नियमित का येत नाही? स्वच्छता का होत नाही? रस्त्यांवर खड्डे का पडतात? पथदिवे बंद का आहेत? सीसीटीव्ही कार्यरत का नाहीत? डास प्रतिबंधक फवारणी वेळेवर का होत नाही? महानगरपालिकेच्या शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण आणि रुग्णालयांमध्ये चांगली आरोग्य सेवा का मिळत नाही? वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजना का होत नाही? असे प्रश्न विचारणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. भारतीय संविधानाने नागरिकांना माहितीचा अधिकार (RTI) दिला आहे. या अधिकाराच्या माध्यमातून कोणत्याही सार्वजनिक कामाची माहिती, मंजूर निधी, खर्च, कामाचा दर्जा, काम पूर्ण होण्याची मुदत आणि इतर सर्व तपशील मागवता येतात. पारदर्शक प्रशासनासाठी हा अधिकार अत्यंत प्रभावी आहे. नागरिकांनी त्याचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे.

लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित नाही. मतदानानंतरची पाच वर्षे ही अधिक महत्त्वाची असतात. या काळात लोकप्रतिनिधी काय काम करतात, कोणत्या प्रश्नांवर पाठपुरावा करतात, विकासकामांची गुणवत्ता काय आहे, मंजूर निधीचा योग्य वापर झाला का, यावर नागरिकांनी सतत लक्ष ठेवले पाहिजे. लोकप्रतिनिधींना वेळोवेळी जाब विचारणे म्हणजे विरोध नव्हे, तर लोकशाही अधिक मजबूत करण्याचा मार्ग आहे.

प्रत्येक प्रश्नासाठी एखाद्या नेत्याच्या घरासमोर रांगा लावण्याची किंवा त्यांची स्तुती करण्याची आवश्यकता नाही. कायद्याच्या चौकटीत राहून सामान्य नागरिकही प्रशासनाशी थेट संवाद साधू शकतो, अर्ज करू शकतो, माहिती मागवू शकतो आणि आवश्यक असेल तर शांततापूर्ण लोकशाही मार्गाने आंदोलनही करू शकतो. संविधानाने दिलेल्या अधिकारांचा वापर करणे हीच जागृत नागरिकाची ओळख आहे.

आज गरज आहे ती व्यक्तिपूजेची नाही, तर कर्तव्यपूजेची. कोणत्याही पक्षाचा लोकप्रतिनिधी असो, त्याने जनतेच्या हिताची कामे केलीच पाहिजेत. विकासकामे पुढील निवडणुकीसाठी मुद्दे म्हणून राखून ठेवण्यापेक्षा ती वेळेत पूर्ण करणे हेच लोकप्रतिनिधींचे खरे कर्तव्य आहे.

आपल्या घरापासून, सोसायटीपासून, गावापासून आणि प्रभागापासून सुरुवात करून प्रत्येक नागरिकाने समाजासाठी काही वेळ दिला, सार्वजनिक प्रश्न समजून घेतले, प्रशासनाला प्रश्न विचारले आणि विकासकामांवर लक्ष ठेवले, तर अनेक समस्या सहज सुटू शकतात.

आज गरज आहे ती जागृत नागरिकांची. कारण लोकशाहीमध्ये बदल घडविण्याची सर्वात मोठी ताकद कोणत्याही राजकीय पक्षात नसते, ती जनतेच्या एकजुटीत आणि जागरूकतेत असते.

**मतदान करणे हे लोकशाहीचे पहिले पाऊल आहे; पण मतदानानंतर लोकप्रतिनिधींना जबाबदार धरणे, विकासकामांवर लक्ष ठेवणे, माहितीचा अधिकार वापरणे आणि जनहितासाठी सातत्याने आवाज उठवणे हेच खऱ्या अर्थाने सजग नागरिकाचे कर्तव्य आहे. लोकशाही टिकते ती घोषणांनी नाही, तर जागृत नागरिकांच्या प्रश्नांनी, सहभागाने आणि संविधानावर असलेल्या विश्वासाने.**

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



### सॅमसंगची पुण्यात मोठी झेप

पुणे (आरंभ पर्व) : सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सने पुण्यात फ्लॅक्टग्रुपच्या नव्या उत्पादन केंद्राचे काम पूर्ण केले असून, या केंद्रातून कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित माहिती केंद्रांसाठी अत्याधुनिक शीतकरण यंत्रणांची निर्मिती केली जाणार आहे. या नव्या उत्पादन केंद्रामुळे भारतासह आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील वाढत्या शीतकरण आणि वातानुकूलन यंत्रणा बाजारपेठेत सॅमसंगची स्थिती अधिक मजबूत होणार आहे. सॅमसंगने नोव्हेंबर २०२५ मध्ये जागतिक वातानुकूलन क्षेत्रातील तज्ज्ञ असलेल्या फ्लॅक्टग्रुप या कंपनीचे अधिग्रहण पूर्ण केले होते. त्यानंतर सुरू झालेले पुण्यातील हे पहिले नवीन उत्पादन केंद्र आहे. सॅमसंग आणि फ्लॅक्टग्रुपच्या एकत्रित व्यवसाय विस्ताराच्या दृष्टीने या केंद्राला महत्त्वाचे स्थान आहे. मुंबई तसेच प्रमुख वाहतूक आणि मालवाहतूक सुविधांच्या जवळ पुण्यात हे उत्पादन केंद्र उभारण्यात आले आहे. त्यामुळे देशातील ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासोबतच आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील विविध देशांमध्ये शीतकरण आणि वातानुकूलन यंत्रणांचा जलद पुरवठा करणे शक्य होणार आहे.

### सॅमसंगच्या दोस्त उपक्रमातून तरुणांच्या कौशल्यांना करिअरची नवी दिशा

पुणे (आरंभ पर्व) : योग्य कौशल्ये, आत्मविश्वास आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळाल्यास तरुणांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात चांगल्या संधी निर्माण करता येतात. सॅमसंग इंडियाच्या 'दोस्त' या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमातून महाराष्ट्रातील अनेक तरुणांना किरकोळ विक्री क्षेत्रातील आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या करिअरला नवी दिशा देण्यात येत आहे. महाराष्ट्रातील सात तरुणांचा देशभरातील 'सॅमसंग दोस्त विक्री' उपक्रमातील ९ हजार ४०० हून अधिक प्रशिक्षणार्थींमधून निवड झालेल्या ३० उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षणार्थींमध्ये समावेश झाला आहे. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत गुरुग्राम येथील सॅमसंग इंडियाच्या प्रादेशिक मुख्यालयात नुकताच त्यांचा सत्कार करण्यात आला. सांगली, छत्रपती संभाजीनगर आणि महाराष्ट्रातील विविध भागांतील या सात तरुणांनी प्रशिक्षणाच्या माध्यमातून आत्मविश्वास वाढविण्यासोबतच ग्राहकांशी संवाद साधणे, उत्पादनांची माहिती प्रभावीपणे समजावून सांगणे, ग्राहकांच्या गरजा ओळखणे आणि उत्पादनांचे प्रात्यक्षिक देणे यांसारखी महत्त्वाची कौशल्ये आत्मसात केली आहेत.

### रक्तदानातून मानवतेचा श्वास जपू : नरेंद्राचार्यजी



पुणे (आरंभ पर्व) : रक्तदानातून माणसाचा श्वास आणि वृक्षसंवर्धनातून सृष्टीचा श्वास अखंड राहतो. सेवा हीच भारतीय संस्कृतीची खरी ओळख असून, आपल्याला मिळालेल्या ज्ञान, सामर्थ्य, संपत्ती आणि कर्तृत्वाचा उपयोग समाजकल्याणासाठी झाला पाहिजे. रक्तदान आणि वृक्षसंवर्धन या दोन्ही सेवा मानवतेच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असून, या सेवायज्ञात समाजातील प्रत्येकाने सहभागी व्हावे, असे आवाहन रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांनी केले. समर्थ सद्गुरू काडसिद्धेश्वर महाराज यांच्या रजत पुण्यस्मृती वर्षानिमित्त खराडी येथील महालक्ष्मी लॉन्स येथे 'ब्लड इन नीड' या मानवतावादी रक्तसेवेच्या देशव्यापी विस्ताराचा कार्यक्रम तसेच 'ऋणानुबंध' मोबाईल ॲप्लिकेशनचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी नरेंद्राचार्यजी बोलत होते. ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे, महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुहास मोहनळकर, वरिष्ठ पत्रकार अंकित काणे, डॉ. रचना पवार आदी उपस्थित होते. नरेंद्राचार्यजी म्हणाले, "जीवनाची खरी समृद्धी आपण किती मिळवले यावर ठरत नाही; आपल्या अस्तित्वामुळे किती जीवांना आधार मिळाला, यावर ती ठरते. ज्याच्याकडे ज्ञान आहे त्याने ज्ञानयज्ञ करावा, ज्याच्याकडे श्रमशक्ती आहे त्याने श्रमयज्ञ करावा आणि ज्याच्याकडे संपत्ती आहे त्याने दानयज्ञ करावा. आजच्या काळात निरोगी व्यक्तीने रक्तदानाचा यज्ञ करावा आणि संवेदनशील मनाच्या प्रत्येक व्यक्तीने रक्तमित्र बनून या करुणामय सेवेत सहभागी व्हावे. एखाद्या जीवाला जीवदान मिळाले, यापेक्षा श्रेष्ठ यज्ञ दुसरा कोणताही असू शकत नाही."

### हिमालया बेबीकेअरचा 'प्युअर बिगिनिंग्स घी गिफ्ट पॅक'



नवी दिल्ली (आरंभ पर्व) : नवजात बाळासाठी दिली जाणारी पहिली भेट ही केवळ एक वस्तू नसून, त्यामागे प्रेम, काळजी आणि शुभेच्छांची भावना असते. हीच भावना केंद्रस्थानी ठेवत हिमालया बेबीकेअरने 'हिमालया बेबी प्युअर बिगिनिंग्स घी गिफ्ट पॅक' या नव्या भेट संचासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित जाहिरात मोहीम सुरू केली आहे. भारतीय कुटुंबांमध्ये नवजात बाळाच्या आगमनाला विशेष महत्त्व असते. बाळाला दिली जाणारी भेट ही सांस्कृतिक परंपरा, जिव्हाळा आणि आशीर्वादाचे प्रतीक मानली जाते. याच भावनेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत हिमालया बेबीकेअरने या मोहिमेत कथाकथनाच्या माध्यमातून बाळाच्या आयुष्याच्या सुरुवातीच्या काळातील काळजी अधोरेखित केली आहे.



### नूतन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये उत्साहात स्वातंत्र्यदिन साजरा

पुणे (आरंभ पर्व) : नूतन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये १५ ऑगस्ट रोजी ८०वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे श्रीकृष्ण सावंत, राहुल रायकर, संगीता शिंदे, प्रमोद गोळे, सुरेश गायकवाड, पंढरी आप्पा रायकर, पांडुरंग रायकर, संकेत देशमुख, चेतन शर्मा व तुषार रायकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाला संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुनीता डांगे, संचालक श्री. राजाराम डांगे, मुख्याध्यापिका सौ. प्रियंका गुजराती तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याचे महत्त्व, देशभक्ती आणि राष्ट्रप्रेम यावर प्रभावी भाषणे केली. त्यांच्या उत्स्फूर्त सादरीकरणातून देशप्रेमाची भावना तसेच स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची जाणीव प्रकर्षाने दिसून आली. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. संपूर्ण शाळेचा परिसर 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम्'च्या घोषणांनी दुमदुमून गेला.

## व्यसनमुक्तीसाठी सुभाष हगवणे यांचे कार्य प्रेरणादायी : फडणीस

### कोंढवे-धावडे येथे सहावा आत्मनिर्भर सन्मान पुरस्कार सोहळा उत्साहात



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

व्यसनमुक्त समाज करण्यासाठी सुभाष हागवणे यांनी केलेले कार्य निश्चितपणे प्रेरणादायी असल्याचे मत महाराष्ट्र राज्याचे विशेष कार्यकारी अधिकारी प्रमोद फडणीस यांनी व्यक्त केले.

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त आत्मनिर्भर सोशल फाऊंडेशनच्या वतीने कोंढवे-धावडे येथील दामिनी मंगल कार्यालयात दि. १४ ते १६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत तीन दिवसीय मोफत निवासी व्यसनमुक्ती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या समारोपप्रसंगी रविवारी (दि. १६) सायंकाळी सहावा 'आत्मनिर्भर सन्मान पुरस्कार' सोहळा उत्साहात संपन्न झाला.

निरोगी समाजनिर्मिती तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा यावेळी आत्मनिर्भर सन्मान पुरस्काराने गौरव करण्यात आला. सौ. रोहिणी ताकवले, श्री. संतोष चाकणकर, श्री. शिवाभाऊ पासलकर, श्री. महेश गायकवाड, श्री. नितीन शेगर आणि श्री. संतोष कोते यांना यावेळी पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुणे महानगरपालिकेचे गटनेते काकासाहेब चव्हाण यांनी व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तीने स्वतः व्यसनमुक्त होऊन इतरांना व्यसनमुक्तीचा मार्ग दाखविणे हीच खरी प्रेरणा असल्याचे सांगितले. सुभाष हगवणे यांच्या कार्याला समाजाने पाठबळ आणि प्रोत्साहन दिले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी आत्मनिर्भर सोशल फाऊंडेशनच्या व्यसनमुक्तीच्या कार्याला आपला पाठिंबा असून, भविष्यातही आवश्यक ते सहकार्य कायम राहील, अशी ग्वाही दिली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून सुभाष हगवणे यांनी व्यसनमुक्ती ही सध्याची सामाजिक गरज असल्याचे सांगितले. सध्या व्यसनाधीनतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असून, समाजात जनजागृती करायची असेल तर व्यसनमुक्तीचा संदेश घराघरात पोहोचणे गरजेचे आहे. या चळवळीला बळ देण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास हगवणे यांनी केले. यावेळी पुणे महानगरपालिकेचे गटनेते काकासाहेब चव्हाण, नगरसेवक सुभाष नाणेकर, प्रदेश भाजपा सचिव दत्ताभाऊ कोल्हे, किरकटवाडीचे माजी सरपंच गोकुळ करंजावणे, माजी पंचायत समिती सदस्य सुवर्णा करंजावणे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कोंढवे-धावडेचे माजी सरपंच नितीन धावडे यांचे विशेष सहकार्य लाभले. व्यसनमुक्तीचा संदेश देणाऱ्या विविध उपक्रमांसह सहावा आत्मनिर्भर सन्मान पुरस्कार सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## अंजनी नॅशनल स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**कोंढवे-धावडे (दै. आरंभ पर्व)**



अतुल (आप्पा) बबनराव धावडे पाटील स्पोर्ट्स अँड सोशल फाऊंडेशन संचलित अंजनी नॅशनल स्कूलमध्ये १५ ऑगस्ट रोजी ८०वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक व देशभक्तीपर कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सादरीकरणामुळे संपूर्ण शाळेच्या परिसरात उत्साहाचे आणि देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे खडकवासला शहर व ग्रामीण अध्यक्ष त्र्यंबक मोकाशी, माजी सरपंच उमेशभाऊ सरपाटील, सामाजिक कार्यकर्ते तथा सुवर्णकमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन सुभाषभाऊ मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच अंजनी नॅशनल स्कूलचे अध्यक्ष तथा खडकवासला विधानसभा युवक अध्यक्ष (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष) अतुल (आप्पा) बबनराव धावडे पाटील, डायरेक्टर सोनाली अतुल धावडे, प्रिन्सिपल सुवर्णा नवनाथ धावडे यांच्यासह शाळेतील शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीत, नृत्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देत मान्यवरांनी स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

## शिवाभाऊ पासलकर यांना पुरस्कार प्रदान



- महाराष्ट्रातून १००० हून अधिक मिसिंग व्यक्तींचा शोध

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपच्या माध्यमातून सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्याचे उल्लेखनीय सामाजिक कार्य करणारे शिवाभाऊ पासलकर यांना 'आत्मनिर्भर पुरस्कार २०२६'ने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्राच्या विविध भागांतून सोशल मीडियाच्या माध्यमातून १००० हून अधिक बेपत्ता व्यक्तींचा शोध लावण्यात योगदान दिल्याबद्दल शिवाभाऊ पासलकर यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपच्या वतीने हा सन्मान प्रदान करण्यात आला. बेपत्ता व्यक्तींच्या शोधासाठी सोशल मीडिया हे प्रभावी माध्यम ठरू शकते, हे पासलकर यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे. विविध ठिकाणांहून बेपत्ता झालेल्या व्यक्तींची माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रसारित करून त्यांचा शोध घेण्यासाठी ते सातत्याने प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या या कार्यामुळे अनेक कुटुंबांना आपल्या हरवलेल्या व्यक्ती पुन्हा मिळाल्या असून, त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे.





## संकल्प इंटरनॅशनल स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संकल्प इंटरनॅशनल स्कूलमध्ये १५ ऑगस्ट २०२६ रोजी ८०वा स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता शाळेच्या प्रांगणात झाली. यावेळी शाळेच्या अध्यक्षा सौ. राधिका गिरमे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत आणि ध्वजगीतानंतर उपस्थितांनी तिरंग्याला मानवंदना दिली. स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, समूहगीते तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्राथमिक व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या प्रभावी भाषणातून स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचा गौरव केला. तसेच देशाच्या विकासात तरुणांची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावर प्रकाश टाकला.

शाळेच्या अध्यक्षा सौ. राधिका गिरमे यांनी आपल्या संदेशातून विद्यार्थ्यांना शिस्त, पर्यावरणाचे रक्षण आणि तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करण्याचे आवाहन केले. यावेळी शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि मोठ्या संख्येने उपस्थित पालकांच्या सहभागामुळे स्वातंत्र्यदिन सोहळ्याला विशेष रंगत आली. देशभक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

### योग्य नियोजन, सातत्यपूर्ण सराव आणि आत्मविश्वासातून यशाचा मार्ग

## तयारी शिष्यवृत्ती परीक्षेची



• लेखक : श्री. श्रीकांत जंगम •
एम.ए., डी.एड., बी.एस्सी., बी.एड., डी.एस.एम.
पदवीधर शिक्षक, पुणे महानगरपालिका

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात शिष्यवृत्ती परीक्षेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. ही परीक्षा विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची, बुद्धिमत्तेची, आकलनशक्तीची तसेच समस्या सोडविण्याच्या क्षमतेची चाचणी घेते. शिष्यवृत्ती मिळाल्यास आर्थिक मदतीबरोबरच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची दखल घेतली जाते आणि पुढील शिक्षणासाठी त्यांना प्रोत्साहन मिळते. शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवण्यासाठी केवळ अभ्यास पुरेसा नसून योग्य नियोजन, सातत्य, मेहनत आणि आत्मविश्वास या चारही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे परीक्षेची तयारी कशी करावी, याचे नियोजन विद्यार्थ्यांनी सुरुवातीपासूनच करणे आवश्यक आहे. तयारीचा पहिला टप्पा म्हणजे परीक्षेचे स्वरूप आणि अभ्यासक्रम समजून घेणे. कोणते विषय आहेत, कोणत्या प्रकारचे प्रश्न विचारले जातात, गुणांचे वाटप कसे आहे आणि उपलब्ध वेळेचे नियोजन कसे करायचे, याची माहिती विद्यार्थ्यांनी करून घ्यावी. अभ्यासक्रमाचे बारकाईने निरीक्षण करून त्यानुसार नियमित अभ्यासाचे वेळापत्रक तयार करावे.

मराठी विषयात व्याकरण, शब्दसंग्रह, म्हणी, वाक्प्रचार, उताऱ्यावरील प्रश्न आणि भाषिक कौशल्यांचा समावेश असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय लावावी. पुस्तके, वर्तमानपत्रे आणि मासिके वाचल्याने भाषेवरील प्रभुत्व वाढते तसेच आकलनशक्ती विकसित होते. गणित हा शिष्यवृत्ती परीक्षेतील महत्त्वाचा विषय आहे. बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, अपूर्णांक, दशांश, टक्केवारी, क्षेत्रफळ, परिमिती आदी संकल्पनांचा सखोल अभ्यास करावा. गणितातील प्रश्न सोडवताना वेग आणि अचूकता यांना विशेष महत्त्व असते. त्यामुळे दररोज गणिताचा सराव करणे आवश्यक आहे. बुद्धिमत्ता चाचणीमध्ये विद्यार्थ्यांची विचारशक्ती, निरीक्षणशक्ती आणि तर्कशक्ती तपासली जाते. संख्या मालिका, आकृतिबंध, वर्गीकरण, कोडी आणि तर्काधारित प्रश्नांचा नियमित सराव केल्यास समस्या सोडविण्याची क्षमता वाढते. विविध प्रश्नसंचांचा सराव विद्यार्थ्यांना निश्चितच उपयुक्त ठरतो. मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा अभ्यास करणे अत्यंत उपयुक्त ठरते. त्यामुळे परीक्षेचे स्वरूप, प्रश्नांची काठिण्यपातळी आणि वेळेचे व्यवस्थापन याची कल्पना येते. प्रश्नपत्रिका सोडवताना प्रत्यक्ष परीक्षेप्रमाणे वेळेचे बंधन ठेवावे. त्यामुळे परीक्षेचा आत्मविश्वास वाढतो आणि प्रश्न सोडविण्याचा वेगही सुधारतो. नवीन अभ्यास करण्याइतकीच पुनरावृत्ती महत्त्वाची आहे. शिकलेल्या घटकांची दर आठवड्याला आणि दर महिन्याला उजळणी करावी. नियमित पुनरावृत्तीमुळे ज्ञान अधिक दृढ होते आणि परीक्षेच्या वेळी चुका कमी होतात.

अभ्यासासोबत आरोग्याची काळजी घेणे तितकेच आवश्यक आहे. संतुलित आहार, पुरेशी झोप आणि नियमित व्यायामामुळे शरीर व मन निरोगी राहते. सतत अभ्यास करण्याऐवजी अभ्यास आणि विश्रांती यांचा योग्य समतोल राखणे आवश्यक आहे. आजच्या आधुनिक युगात ऑनलाइन शैक्षणिक साधनांचा वापर करूनही परीक्षेची तयारी करता येते. शैक्षणिक संकेतस्थळे, ऑनलाइन व्हिडिओ, सराव चाचण्या आणि विविध शैक्षणिक ॲप्सचा उपयोग करता येतो. मात्र, तंत्रज्ञानाचा वापर केवळ शैक्षणिक उद्देशाने करून अनावश्यक गोष्टींमध्ये वेळ वाया जाणार नाही, याची विद्यार्थ्यांनी काळजी घ्यावी.

### आत्मविश्वास कायम ठेवा

एखादा विषय कठीण वाटला किंवा एखादा प्रश्न सोडविता आला नाही, तरी विद्यार्थ्यांनी निराश होऊ नये. शिक्षक, पालक आणि मित्रांचे मार्गदर्शन घ्यावे. शंका त्वरित विचारून त्यांचे निरसन करावे. नियमित सराव आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे कोणतीही अडचण दूर करता येते.

### विविध स्पर्धा परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांसाठी संधी

हल्ली अनेक शाळांमधून विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतली जाते. एनएमएमएस, शिष्यवृत्ती, बालवैज्ञानिक, प्रज्ञाशोध, मंथन यांसारख्या विविध परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या आत्मविश्वासातही वाढ होते. या परीक्षांमधून विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आर्थिक हातभार मिळण्याची संधी उपलब्ध होते.

त्यामुळे पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी या स्पर्धा परीक्षांकडे केवळ परीक्षा म्हणून न पाहता स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची आणि भविष्यासाठी पुढे जाण्याची एक महत्त्वपूर्ण संधी म्हणून पाहावे. पालकांनी विद्यार्थ्यांना अशा परीक्षांना बसण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक सुवर्णसंधी आहे. कठोर परिश्रम, नियमित अभ्यास, योग्य नियोजन, सातत्य आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर प्रत्येक विद्यार्थी यश मिळवू शकतो. शिष्यवृत्ती ही केवळ आर्थिक मदत नसून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची आणि कर्तृत्वाची पावती आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवून मनापासून प्रयत्न करावेत आणि आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी यशाचा मार्ग प्रशस्त करावा.

सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

## थोडक्यात पण महत्वाचे



### ऑपरेशन सिंदूर; ८८ तासांच्या प्रत्युत्तराची पडद्यामागची कहाणी

पुणे (आरंभ पर्व) : भारताच्या अलीकडील लष्करी इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण अध्याय असलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ची पडद्यामागील कहाणी आता प्रेक्षकांसमोर आली आहे. डिस्कव्हरीने 'डीक्लासिफाइड: ऑपरेशन सिंदूर' या दोन भागांच्या माहितीपट मालिकेत भारताच्या वरिष्ठ लष्करी व राष्ट्रीय सुरक्षा नेतृत्वापासून ते कारवाईचे नेतृत्व करणारे कमांडर आणि आघाडीवरील जवानांपर्यंतचा प्रत्यक्ष अनुभव मांडला आहे. १५ ऑगस्ट रोजी डिस्कव्हरीवर विशेष प्रीमियर झाल्यानंतर ही मालिका डिस्कव्हरी+ वर प्रवाहासाठी उपलब्ध झाली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने आखलेल्या आणि अवघ्या ८८ तासांच्या कालावधीत निर्णायक व नियोजित प्रत्युत्तर देणाऱ्या कारवाईचा प्रवास या माहितीपटातून उलगडण्यात आला आहे. कारवाईमागील नियोजन, गुप्तचर माहितीचे संकलन, लक्ष्य निश्चिती, टेहळणी, सराव-सत्रे तसेच विविध संभाव्य परिस्थितींचा विचार करून केलेली तयारी याची माहिती पहिल्या भागात देण्यात आली आहे. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी ऑपरेशन सिंदूरनंतरच्या पहिल्याच मुलाखतीत या माहितीपटात कारवाईचे उद्दिष्ट स्पष्ट केले आहे. पहलगाम हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या दहशतवादी तळांचा विध्वंस करणे हे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. भारताचा संयम किंवा उदारपणा ही कमजोरी समजू नये आणि गरज पडल्यास भारत निर्णायक प्रत्युत्तर देऊ शकतो, असा स्पष्ट संदेशही त्यांनी दिला.



### एनडीए, सिंहगड रोडच्या कोंडीवर पर्यायी मार्गाचा उतारा

- नांदेड सिटी-खडकवासला स्मशानभूमी रस्ता पूर्ण करण्याची अतुल धावडे यांची मागणी

पुणे (आरंभ पर्व) : एनडीए रोड आणि सिंहगड रोडवर सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी नांदेड सिटीमधून खडकवासला स्मशानभूमीकडे जाणारा अपूर्ण रस्ता तातडीने पूर्ण करून वाहतुकीसाठी खुला करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे युवक अध्यक्ष अतुल (आप्पा) बबनराव धावडे-पाटील यांनी केली. यासंदर्भात संसदरत्न खासदार सुप्रिया सुळे आणि पुणे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांच्या उपस्थितीत महापालिकेत बैठक झाली. एनडीए रोड आणि सिंहगड रोडला पर्यायी मार्ग उपलब्ध झाल्यास या दोन्ही प्रमुख रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो, असे धावडे यांनी बैठकीत निदर्शनास आणून दिले. नांदेड सिटी ते खडकवासला स्मशानभूमीपर्यंतचा सुमारे अर्धा किलोमीटरचा रस्ता काही ठिकाणी अपूर्ण आहे. हा रस्ता पूर्ण करण्याबाबत आयुक्त राम यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. तसेच, रस्ता लवकरच नागरिकांच्या वापरासाठी खुला करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. दरम्यान, हा पर्यायी मार्ग सुरू झाल्यास सिंहगड रस्ता, एनडीए रोड तसेच परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. बैठकीस आमदार बापूसाहेब पठारे माझी महापौर अंकुश अण्णा काकडे महापालिकेचे गटनेते काकासाहेब चव्हाण, नगरसेविका अनिता इंगळे, नगरसेवक गफूर पठाण शहर युवक अध्यक्ष किशोर कांबळे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील ग्रामीण अध्यक्ष त्र्यंबक मोकाशी यांच्यासह संबंधित पदाधिकारी उपस्थित होते.



### अमितेश कुमार यांचा मान्यवरांकडून विशेष सत्कार!

पुणे (आरंभ पर्व) : पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना त्यांच्या उल्लेखनीय आणि कर्तव्यदक्ष सेवेबद्दल केंद्रीय गृह मंत्रालयाकडून मानाचे 'अतिउत्कृष्ट सेवा पदक' जाहीर झाले आहे. या गौरवपूर्ण कामगिरीबद्दल पुणे शहरातील विविध क्षेत्रांतील प्रमुख लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने पोलीस आयुक्तांचा पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. दरम्यान यावेळी उत्कृष्ट सेवेबद्दल सहपोलिस आयुक्त संजय दराडे यांचाही शिष्टमंडळाने विशेष सत्कार केला. पुणे पोलीस आयुक्तपदाची सूत्रे हातात घेतल्यापासून अमितेश कुमार यांनी शहरातील गुन्हेगारी नियंत्रण, अवैध धंद्यांवरील धडक कारवाई आणि सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण या त्रिसूत्रीवर विशेष भर दिला आहे. त्यांच्या याच गतिमान आणि धाडसी कार्यपद्धतीमुळे पुणे शहर आणि पोलीस दलाचा लौकिक अत्यंत वाढल्याची भावना या सत्कार प्रसंगी मान्यवरांनी व्यक्त केली. या विशेष सत्कार प्रसंगी पुणे शहराचे माजी नगरसेवक अय्युब शेख, माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, शिवसेना नेते अजय भोसले, शिक्षण मंडळाचे माजी सदस्य बाळासाहेब जानराव, रिपब्लिकन सोशालिस्ट पक्षाचे राहुल डंबाळे, शिवसेनेचे मिलिंद आहिरे तसेच सामाजिक कार्यकर्ते आबिद सय्यद आणि इतर सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी आयुक्त अमितेश कुमार यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# दमदार कंटेंटसह मराठी झी5ची आघाडी अधिक मजबूत

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

प्रादेशिक आशयाला देशभरात वाढती पसंती मिळत असताना मराठी कथांमधील वैविध्य, सांस्कृतिक समृद्धी आणि आशयाची ताकद यावर भर देत मराठी झी5ने आपल्या दुसऱ्या वर्षासाठी दमदार आणि वैविध्यपूर्ण मनोरंजनाची घोषणा केली आहे. पहिल्या वर्षात मिळालेल्या प्रेक्षकांच्या प्रतिसादानंतर लोकप्रिय मालिकांचे नवे भाग, नवीन मूळ मालिका, चित्रपट, विनोदी कार्यक्रम, प्रीमियम आशय आणि थेट क्रीडा स्पर्धांचा समावेश असलेले विस्तृत मनोरंजनविश्व प्रेक्षकांसमोर आणण्यात येणार आहे. मराठी प्रेक्षकांसाठी वर्षभर




दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण कथा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आघाडीच्या निर्मिती संस्थांसोबत

> **विनोदापासून प्रीमियम आशयापर्यंत**
>
> मनोरंजनाची व्याप्ती वाढवण्यासाठी 'हसवा हसवी - द मराठी स्टँड-अप शो' हा विनोदी विशेष कार्यक्रमही सादर करण्यात येणार आहे. अनिश गोरेगांवकर निर्मित या कार्यक्रमात अनिश गोरेगांवकर, फातिमा आयेशा, संकेत जोशी, साहिल होराणे आणि साहिल शेख सहभागी होणार आहेत.

सहकार्य करण्यात आले आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील नामवंत कलाकार आणि निर्मात्यांच्या कलाकृतींसोबतच नव्या प्रतिभेलाही व्यासपीठ देण्याचा प्रयत्न या नव्या आशयातून दिसून येतो. मराठी झी5च्या लोकप्रिय मालिकांपैकी दोन गाजलेल्या मालिकांचे नवे भाग पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. बहावा एंटरटेनमेंटची 'हे काय नवीन?' ही मालिका दुसऱ्या पर्वासह परतणार असून, उमेश कामत आणि प्रिया बापट ही लोकप्रिय जोडी पुन्हा एकदा एकत्र दिसणार आहे. सिनेमास्टर्स प्रॉडक्शनची 'देवखेळ' ही मालिकाही दुसऱ्या पर्वासह प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यामध्ये अंकुश चौधरी आणि प्राजक्ता माळी ही लोकप्रिय जोडी पुन्हा एकत्र दिसणार आहे.

नव्या आशयामध्ये भरत जाधव, शर्वरी जमेनीस, पुष्कर श्रोत्री आणि शिवानी रांगोळे यांच्या भूमिका असलेली 'कोण यशवंत पानसरे?' ही मालिका विशेष आकर्षण ठरणार आहे. याशिवाय कोक्लिको पिक्चर्सची '११२' ही मालिकाही सादर करण्यात येणार आहे. निखिल महाजन यांनी निर्मिती केलेल्या या मालिकेचे दिग्दर्शन जीविषा काळे आणि रोहित सातपुते यांनी केले आहे.

विविध विषय, प्रभावी कथानक आणि नव्या कलाकारांना संधी देण्याचा प्रयत्न या मालिकांमधून करण्यात आला आहे. मालिकांसोबतच विविध प्रकारच्या चित्रपटांचाही मोठा संग्रह प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाल्यानंतर झी5वर येणाऱ्या चित्रपटांमध्ये झी स्टुडिओजच्या 'तुंबाडची मंजुळा'चा समावेश आहे.

जितेंद्र जोशी, सई ताम्हणकर, मकरंद अनासपुरे आणि ओम भुतकर यांच्या भूमिका असलेल्या या चित्रपटाची प्रेक्षकांना उत्सुकता आहे. याशिवाय नील सालेकर, सिद्धांत सरफरे, शुभम जाधव, सौरभ घाडगे आणि करण सोनावणे यांच्या भूमिका असलेला 'भूतम् भयम्' हा चित्रपटही प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# पारिजात इंडस्ट्रीज–हेल्मची धोरणात्मक भागीदारी

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

जर्मनीस्थित हेल्म एजी आणि भारतात मुख्यालय असलेल्या पारिजात इंडस्ट्रीज यांनी डिजिटल वाणिज्य, ब्रँडेड पीक संरक्षण उत्पादने, तंत्रज्ञान उत्पादन आणि आंतरराष्ट्रीय वितरण या क्षेत्रांमध्ये सहकार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. या सहकार्याद्वारे हेल्मचा जागतिक कृषी-आदान पोर्टफोलिओ आणि तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म पारिजातच्या उत्पादन क्षमता, जागतिक वितरण नेटवर्क आणि फॉर्म्युलेशन उत्पादन क्षमतांशी जोडला जाणार आहे.




हेल्मच्या पोर्टफोलिओ कंपनी पीट जीएमबीएच आणि तिच्या प्लांटिक्स या डिजिटल कृषी मंचाचाही या सहकार्यामध्ये समावेश आहे.

या कराराअंतर्गत पारिजात किरकोळ विक्रेत्यांवर केंद्रित डिजिटल वाणिज्य मंच आणि त्याच्याशी संबंधित किरकोळ विक्रेता डेटाबेसचे अधिग्रहण करणार आहे. त्यामुळे प्रमुख प्रदेशांमध्ये खरेदी प्रक्रिया, बाजारपेठेतील प्रवेश आणि उत्पादन वितरण अधिक प्रभावी होण्याची अपेक्षा आहे.


पारिजातला प्लांटिक्सच्या शेतकरी सहभाग आणि मागणी निर्मितीच्या क्षमतांचाही लाभ मिळणार आहे. शेतकऱ्यांपर्यंत थेट पोहोचण्यासाठी प्लांटिक्सच्या काही वैशिष्ट्यांचे विशेष एकत्रीकरण केले जाणार आहे.

या सहकार्यामुळे भारतात हेल्मच्या ब्रँडअंतर्गत नवीन उत्पादन मालिका सादर केली जाणार असून, पारिजात आणि तिची उपकंपनी लीड्स लाइफसायन्सेस यांना भारतात हेल्मचे ब्रँडिंग वापरण्याचे विशेष अधिकार मिळणार आहेत. पारिजात भारतात हेल्मची 'प्लांट अॅडव्हान्टेज लाइन' म्हणजेच जैव-उत्तेजक आणि जैविक उत्पादने सादर करण्याचीही योजना आखत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर हेल्मच्या जागतिक गरजा पूर्ण करण्यासाठी पारिजातच्या उत्पादन क्षमता आणि पेटंटाधारित फॉर्म्युलेशन विकास क्षमतांचा उपयोग केला जाणार आहे.

# एचडीएफसी बँकेचा अनोखा संदेश

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशाच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला एचडीएफसी बँकेने डिजिटल फसवणुकीबाबत जनजागृती करण्यासाठी 'विजिल आंटी सेज – लेझिनेस सेव्हज' हे अनोखे अभियान सुरू केले आहे.




या अभियानासाठी बँकेने प्रसिद्ध स्टँड-अप कॉमेडियन विजिल आंटी यांच्यासोबत भागीदारी केली असून, 'फसवणुकीच्या बाबतीत थोडे थांबणे म्हणजेच बचत करणे' हा संदेश देण्यात आला आहे. १५ ऑगस्ट २०२६ पासून जिओहॉटस्टारवर या अभियानाची सात भागांची विनोदी मालिका पाहता येणार आहे. बनावट ओटीपी मागणी, फिशिंग लिंक किंवा डिजिटल अटक यांसारख्या फसवणुकीच्या प्रकारांमध्ये फसवणूक करणारे लोक घाई आणि भीती निर्माण करून समोरच्या व्यक्तीकडून तातडीने कृती करून घेण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी घाईघाईने प्रतिसाद न देता काही क्षण थांबणे आणि संशयास्पद विनंतीकडे दुर्लक्ष करणे हेच सुरक्षित पाऊल असल्याचा संदेश या अभियानातून देण्यात आला आहे.

## जादू, आशा आणि विस्मयाचा अनुभव देणारा 'द ग्रेट ग्रँड सुपरहिरो' २१ ऑगस्टला

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

आजच्या धावपळीच्या आणि अनेकदा अस्वस्थ करणाऱ्या जगात आशा, कल्पनाशक्ती आणि नात्यांचे महत्त्व अधोरेखित करणारा 'द ग्रेट ग्रँड सुपरहिरो' हा कौटुंबिक चित्रपट २१ ऑगस्ट २०२६ रोजी झी5वरील किड्झीवर प्रदर्शित होणार आहे. मनीष सैनी दिग्दर्शित या चित्रपटात जॅकी श्रॉफ यांच्यासह प्रतीक बब्बर, भाग्यश्री, शरत सक्सेना, मिहीर गोडबोले आणि अन्य कलाकारांच्या भूमिका आहेत. बालपणातील जादू, आजी-आजोबा आणि नातवंडांमधील प्रेमळ नाते तसेच अशक्य वाटणाऱ्या गोष्टींवर विश्वास ठेवण्याची ताकद या चित्रपटातून मांडण्यात आली आहे. विनोद, कल्पनारम्य प्रसंग, साहस




आणि हृदयस्पर्शी भावनांची सांगड घालणारी ही कथा सर्व वयोगटांतील प्रेक्षकांसाठी मनोरंजनाचा अनुभव देणारी आहे. चित्रपटाची कथा दीपू या हुशार मुलाभोवती फिरते. वडिलांच्या बदलीच्या नोकरीमुळे त्याच्या कुटुंबाला वारंवार वेगवेगळ्या शहरांमध्ये स्थलांतर करावे लागते.

# रविंद्र चव्हाण यांच्याकडून प्रत्यक्ष बैठकीत थेट कानपिचक्या

**नागपूर (दै. आरंभ पर्व)**

नागपूर पदवीधर मतदारसंघातील विजयासाठी नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील एकूण अंदाजे बारा लक्ष सुशिक्षित पदवीधर मतदारांपैकी किमान पन्नास हजार नवे मतदार नोंदणी करून घ्यावे आणि सोशल मीडियावर तसेच नागरिकांच्या प्रत्यक्ष गाठीभेटीत सक्रिय होत केंद्र तसेच राज्य सरकारने केलेल्या कामांचे प्रमोशन करावे अशा सूचना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नेत्यांना दिल्या. नागपुरात मंचावर राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, भाजप आमदार प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, परिणय फुके आणि शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी असताना या कानपिचक्या त्यांनी



दिल्या आहेत. नागपूर पदवीधर मतदारसंघाची निवडणूक अवघ्या चार महिन्यांवर येऊन ठेपली असताना आतापासूनच भाजपने मोर्चेबांधणी सुरू केली आहे. गेल्यावेळी प्रथमच भाजपला पराभवाचा सामना करावा लागला होता त्याची आठवण करून देत प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पूर्व विदर्भात दोन दिवसांत सहा बैठका घेतल्या. नागपूरच्या एअरपोर्ट बँकवेट हॉल येथील आपल्या दौऱ्याच्या अंतिम बैठकीत नागपूर शहर, नागपूर ग्रामीण आणि वर्धा येथील प्रमुख भाजप पदाधिकारी, नगरसेवक आणि नेत्यांच्या उपस्थितीत भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्वात आधी आपल्याला ही निवडणूक जिंकायची आहे का..आपली तशी इच्छा आहे का..असा सवाल टाकत रवींद्र चव्हाण यांनी सर्व उपस्थितांची विकेट घेतली.डिजिटल प्लॅटफॉर्म वर आपल्यापैकी किती जणांची सक्रिय उपस्थिती असते असे पुढे सवाल करत त्यांनी सर्व उपस्थितांना अंतर्मुख केले..आणि आपण सोशल मीडियावर कमी पडतो, असे सरळ स्पष्ट विधान करून कानपिचक्या दिल्या.

रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की नागपूर शहर, ग्रामीण आणि वर्धा मिळून सुमारे अंदाजे सत्तर लाख लोकसंख्या आहे. यापैकी सुशिक्षित पदवीधर अंदाजे 12 लाख असावेत असा अंदाज आहे. आपली राज्यात दीड लाखांपेक्षा जास्त सक्रिय सदस्य असलेली पार्टी. इथल्या 80 टक्के लोकांनी डिजिटल प्लॅटफॉर्म वर सक्रिय असल्याचे सांगितले आहे. पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, राज्याचे मुख्यमंत्री आणि राज्याचे मंत्री यांनी घेतलेले निर्णय पाहून त्यासाठी डिझाइन बनवून तुमचे नाव, तुमचे पद यांचा उल्लेख करून आपल्या पेजवर टाकत राहिलो आणि शेअर करत राहिलो तर महाराष्ट्रात एक चांगले वातावरण तयार करण्यात यशस्वी ठरू.

# श्री स्वामी बॅग्जचा १९वा वर्धापन दिन उत्साहात

## ग्राहकांच्या विश्वासाची १९ वर्षांची यशस्वी वाटचाल; वर्धापन दिनानिमित्त १० टक्के सवलतीची संधी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेली अनेक वर्षे ग्राहकांच्या विश्वासाला पात्र ठरत दर्जेदार उत्पादने आणि विश्वासार्ह सेवा देणाऱ्या श्री स्वामी बॅग्ज, माणिकबाग शाखेचा १९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त ग्राहकांना खरेदीवर १० टक्के विशेष सवलत देण्यात आली. या सवलतीचा ग्राहकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला.

श्री स्वामी बॅग्जची शनिपार येथील सुरुवात सन १९७७ मध्ये झाली. त्यावेळेपासून जगताप परिवार ग्राहकांच्या सेवेसाठी कटिबद्ध असून, प्रामाणिक व्यवहार, दर्जेदार उत्पादने आणि ग्राहकांचा विश्वास या त्रिसूत्रीवर श्री स्वामी बॅग्जने आपली वाटचाल सुरू ठेवली आहे.

प्रफुल्ल वसंत जगताप, राहुल वसंत जगताप आणि गणेश वसंत जगताप या जगताप बंधूंनी आपल्या मेहनतीच्या आणि ग्राहकाभिमुख कार्यपद्धतीच्या जोरावर श्री स्वामी बॅग्जचा लौकिक वाढविला आहे. अनेक वर्षांपासून ग्राहकांनी दाखविलेला विश्वास कायम राखण्यासाठी जगताप बंधू सातत्याने प्रयत्नशील आहेत.

श्री स्वामी बॅग्जमध्ये






• अधिक माहितीसाठी •
www.shriswamibags.com
पुणे हेड ऑफिस :
०२०-२४४३१००१

ग्राहकांच्या गरजेनुसार विविध प्रकारच्या बॅग्ज, स्कूल बॅग्ज, ट्रॅव्हल बॅग्ज, ऑफिस बॅग्ज, छत्र्या, रेनकोट, विविध प्रकारच्या सिझनेबल टोप्या तसेच अनेक प्रकारच्या उपयोगी वस्तू उपलब्ध आहेत. त्यामुळे सिंहगड रोड परिसरासह पुणे शहरातील ग्राहकांसाठी श्री स्वामी बॅग्ज हे खरेदीचे एक विश्वासाचे ठिकाण बनले आहे.

श्री स्वामी बॅग्जच्या शनिपारजवळ, माणिकबाग, सिंहगड रोड, धनकवडी, सातारा रोड, सदाशिव पेठ आणि नागनाथपार या भागात शाखा कार्यरत आहेत. विविध भागांत शाखांचा विस्तार केल्यामुळे ग्राहकांना त्यांच्या जवळच्या शाखेतून खरेदीची सुविधा उपलब्ध झाली आहे. माणिकबाग शाखेमध्ये व्यवस्थापक श्री. महादेव पाटील हे ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी कार्यरत आहेत. ग्राहकांच्या गरजा समजून घेऊन त्यांना योग्य उत्पादनाची माहिती देणे, दर्जेदार वस्तू उपलब्ध करून देणे आणि समाधानकारक सेवा देण्यावर शाखेचा विशेष भर आहे.

वर्धापन दिनाच्या निमित्ताने आयोजित विशेष सवलतीमुळे ग्राहकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. १० टक्के सवलतीत खरेदी करण्याची संधी मिळाल्याने ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात खरेदीचा लाभ घेतला.

यावेळी बोलताना श्री स्वामी बॅग्जचे राहुल जगताप म्हणाले, "गेली अनेक वर्षे ग्राहकांनी आमच्यावर जो विश्वास ठेवला आहे, तोच आमच्यासाठी सर्वात मोठा आधार आहे. ग्राहकांनी यापुढेही असाच विश्वास आणि सहकार्य कायम ठेवावे, हीच आमची अपेक्षा आहे. ग्राहकांचे समाधान आणि विश्वास कायम ठेवण्यासाठी आम्ही यापुढेही प्रामाणिकपणे सेवा देत राहू."

ग्राहकांचा विश्वास, दर्जेदार उत्पादने, योग्य दर आणि सातत्यपूर्ण सेवा यांच्या जोरावर श्री स्वामी बॅग्जने पुणे शहरात आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, १९ व्या वर्धापन दिनानिमित्त या विश्वासाच्या वाटचालीला नव्या उत्साहाची जोड मिळाली आहे.

## आरपीआय ख्रिश्चन आघाडीच्या १६ नवीन शाखांचे पुण्यात उद्घाटन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)च्या ख्रिश्चन आघाडीच्या १६ नवीन शाखांचे पुणे शहरात भव्य उद्घाटन करण्यात आले. पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासोबतच समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने या शाखांची स्थापना करण्यात आली आहे.

यावेळी पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, नगरसेविका हिमाली कांबळे, सरचिटणीस शाम सदाफुले, सुनिल गवळी, विनोद टोपे, ख्रिश्चन आघाडी अध्यक्ष क्रिस्टोपर राजमनी, महिला अध्यक्षा डोर्थी थॉमस आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ख्रिश्चन समाजातील नागरिकांच्या सामाजिक, शैक्षणिक व विविध प्रश्नांना संघटितपणे वाचा फोडण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्याबरोबरच संविधानिक मूल्ये, सामाजिक न्याय आणि समतेच्या विचारांचा प्रसार करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नवीन शाखांच्या माध्यमातून पक्षाचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचविणे, युवकांना संघटनेशी जोडणे तसेच सामाजिक उपक्रमांना चालना देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. आगामी काळात पुणे शहरातील विविध भागांत संघटन विस्ताराला अधिक गती देण्यात येणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. कार्यक्रमाला आरपीआय (आठवले)चे पदाधिकारी, ख्रिश्चन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन शाखांच्या पदाधिकाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. संघटनेच्या माध्यमातून समाजाच्या विविध प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



## नांदेड सिटी ते स्वारगेट, शिवाजीनगर पीएमपीएमएल बससेवेचा शुभारंभ

- नांदेड सिटीकरांना मोठा दिलासा

पुणे (आरंभ पर्व) : नांदेड सिटी परिसरातील नागरिकांच्या सार्वजनिक वाहतुकीच्या मागणीला अखेर यश आले असून, पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) वतीने कलाश्री ते स्वारगेट तसेच कलाश्री ते शिवाजीनगर या नवीन बससेवांचा शुभारंभ करण्यात आला. ही बससेवा कलाश्री–नांदेड सिटी मेन गेट–धायरी फाटा–स्वारगेट या मार्गावर धावणार असून, परतीची बससेवाही उपलब्ध राहणार आहे. तसेच कलाश्री ते शिवाजीनगर आणि शिवाजीनगर ते कलाश्री या मार्गावरही बससेवा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना स्वारगेट व शिवाजीनगरला जाणे सुलभ होणार आहे. नांदेड सिटी परिसराचा झपाट्याने विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन नांदेड सिटी रहिवासी चेअरमन यांनी पीएमपीएमएल प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. उद्घाटनप्रसंगी पुणे महापालिकेचे नगरसेवक काकासाहेब चव्हाण, नगरसेविका अनिता इंगळे, धनश्री कोल्हे, सामाजिक कार्यकर्त्या रश्मी घुले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर उपाध्यक्ष रुपेश घुले, विधानसभा अध्यक्ष संदीप मते, इतिहासतज्ज्ञ नंदकिशोर मते, शिवसेना नेते राहुल घुले, सुजित कारले, हेमेंद्र जोशी, कलाश्रीचे चेअरमन हर्षद घुले-पाटील, शंकरराव इंगवले, हनुमंत वाल्हेकर, बबनराव कोडितकर, रत्नदीप जाधव, तुषार कारले, दत्तात्रय देडगे, दशरथ वाल्हेकर, समीर जाधवराव तसेच कलाश्रीचे कमिटी मेंबर व नागरिक उपस्थित होते. पीएमपीएमएलचे व्यवस्थापक यशवंत हिंगे आणि स्वारगेट डेपो मॅनेजर शैलेंद्र जगताप यांच्यासह पीएमपीएमएलचे अधिकारीही उपस्थित होते. नवीन बससेवेमुळे विद्यार्थी, नोकरदार, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठा फायदा होणार आहे.

## सिंहगड किल्ल्यावर पर्यटकांमध्ये वादावादी; हाणामारीपर्यंत प्रकरण

- हवेली पोलिस व सुरक्षा रक्षकांच्या हस्तक्षेपाने परिस्थिती नियंत्रणात

पुणे (आरंभ पर्व) : किल्ले सिंहगड येथे स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी तसेच रविवारी अशा सलग दोन दिवस पर्यटकांच्या दोन गटांमध्ये आपापसात वादावादी होऊन प्रकरण हाणामारीपर्यंत गेले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र वेळीच हवेली पोलीस आणि सुरक्षा रक्षक यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणत शांतता प्रस्थापित केली. सिंहगड हा पुणे जिल्ह्याचा ऐतिहासिक वारसा असून दरवर्षी हजारो पर्यटक येथे भेट देतात. त्यामुळे गडाचे पावित्र्य आणि ऐतिहासिक महत्त्व जपण्याबरोबरच पर्यटकांना सुरक्षित व सुव्यवस्थित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. ही मागणी शिवसेना खडकवासला मतदारसंघातर्फे मा. पंचायत समिती सदस्य नितीन वाघ, सौरभ मोकाशी, आकाश पायगुडे आणि निसर्ग धावडे यांनी हवेली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेश रामाघरे साहेब यांच्याकडे केली आहे.



## धायरीतील कै. वस्ताद हरिभाऊ पोकळे शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात

पुणे (आरंभ पर्व) : धायरी येथील कै. वस्ताद हरिभाऊ पोकळे शाळेत ८०वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात ज्ञानदीप फाउंडेशनच्या वतीने इयत्ता दहावीमध्ये प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल कु. रागिनी इंगोले हिचा सन्मान करण्यात आला. नगरसेविका कोमल नवले यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. यावेळी ज्ञानदीप फाउंडेशनचे अध्यक्ष नामदेवराव भुरुक, काँग्रेस प्रदेश सचिव श्रीरंग चव्हाण पाटील, मा. स्वीकृत सदस्य गंगाधर भडावळे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेखा दमिस्टे, दिगंबर पोकळे, मुख्याध्यापिका वाघमोडे यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कवायती सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कवायतीनंतर विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्यासोबतच गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्यात आले.

## तीन मित्र, अनेक मृतदेह, एक मुलखावेगळा धंदा




मुंबई (आरंभ पर्व) : एखाद्या मृतदेहापासून सुटका करून देणे हा एखादा व्यवसाय असू शकतो? ओरिजिनल्स इंडियाची भारतातील सर्वात मोठी स्ट्रीमिंग सेवा असलेल्या प्राइम व्हिडिओने आज आपल्या आगामी एमएक्स ओरिजिनल, क्लिन-अप कंपनीचा ट्रेलर प्रदर्शित केला. जिओ स्टुडिओचे सादरीकरण आणि GSEAMS Productionची निर्मिती असलेली ही मालिका रोहन घोष यांनी दिग्दर्शित आणि लिहिली असून कोणार्क मुखर्जी यांनी सहलेखन केले आहे. त्यात अमेय वाघ, विशाल जेठवा, अजितेश गुप्ता, जिशू सेनगुप्ता, सास्वता चॅटर्जी आणि रवी किशन यांच्या भूमिका आहेत.

# धायरीतील नागरी प्रश्नांवर ‘स्वच्छ व सुंदर धायरी’चे शांततापूर्ण आंदोलन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धायरी परिसरातील वाढती वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था, अतिक्रमणे, अनियंत्रित पार्किंग, अपुरे पदपथ आणि खड्ड्यांसह विविध नागरी प्रश्नांकडे प्रशासनाचे तातडीने लक्ष वेधण्यासाठी ‘स्वच्छ व सुंदर धायरी कृती समिती’च्या वतीने रविवारी (१६ ऑगस्ट) शांततापूर्ण व अराजकीय आंदोलन करण्यात आले.

काळभैरव मंदिराजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर नागरिक उंबऱ्या गणपती चौक परिसरात एकत्र आले. यावेळी ‘कोंडीमुक्त, खड्डेमुक्त, अतिक्रमणमुक्त, सुरक्षित व स्वच्छ धायरी’ अशी मागणी करत प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

धायरी फाटा ते धायरी गाव, डीएसके रोड, सावित्री गार्डन, बारंगणी मळा चौक तसेच सिंहगड रोडकडे जाणाऱ्या मार्गांवर दिवसेंदिवस वाहतूक कोंडीची समस्या गंभीर होत आहे. वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि मोठ्या गृहप्रकल्पांच्या तुलनेत रस्ते व वाहतूक व्यवस्थेत आवश्यक सुधारणा झालेल्या नसल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

समितीने प्रमुख मार्गांवरील अतिक्रमणे हटविणे, रस्त्यांची दर्जेदार दुरुस्ती करणे, सुरक्षित व अडथळामुक्त पदपथ उपलब्ध करून देणे, पर्यायी रस्त्यांची कामे पूर्ण करणे तसेच आवश्यक ठिकाणी वाहतूक सिग्नल, वाहतूक पोलीस व पार्किंग नियंत्रणाची व्यवस्था करण्याची मागणी केली.

धायरीच्या पुढील १५ ते २० वर्षांतील वाढीचा विचार करून प्रशासनाने एकात्मिक व दीर्घकालीन वाहतूक आराखडा तयार करावा. तसेच सर्व संबंधित विभागांची संयुक्त बैठक घेऊन प्रश्न सोडविण्यासाठी वेळबद्ध कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणी समितीचे समन्वयक विनीत धारणकर व सौ. जयश्री देशपांडे यांनी केली.

हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाच्या विरोधात किंवा समर्थनार्थ नसून नागरिकांच्या मूलभूत नागरी सुविधांसाठी असल्याचे समितीने स्पष्ट केले. प्रशासनाने मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास लोकशाही व शांततापूर्ण मार्गाने पुढील काळातही पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला.



## सतत भूमिका बदलणाऱ्या शरद पवार गटासोबत यापुढे युती नको

- खडकवासला काँग्रेसचे अध्यक्ष उमेश कोकरे यांची प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे आग्रही मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

येत्या ऑगस्ट 22तारखेला पुणे येथे आयोजितराहुलजी गांधी यांच्या 'छात्रों की गूंज' या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धनजी सपकाळ हे खडकवासला विधानसभा मतदारसंघात आले होते. या दौऱ्यादरम्यान खडकवासला विधानसभा मतदारसंघ काँग्रेसचे अध्यक्ष श्री. उमेश भीमराव कोकरे यांनी कार्यकर्त्यांच्या भावना मांडत, यापुढे शरद पवार गटासोबत कोणत्याही प्रकारची युती करू नये, अशी आग्रही मागणी प्रदेशाध्यक्षांकडे केली.यावेळी पुणे शहर काँग्रेस कमिटीच्या शहराध्यक्षा दीप्तीताई चौधरी, ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सदस्या रेहाना चिस्ती, महिला नेत्या अर्चनाताई शहा, ज्येष्ठ नेते लहू आण्णा निवगुणे यांच्यासह खडकवासला मतदारसंघातील काँग्रेसचे पदाधिकारी आणि उमेश कोकरे मित्रपरिवारातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना दिलेल्या निवेदनात उमेश कोकरे यांनी म्हटले आहे की, "शरद पवार गटाच्या सतत बदलत राहणाऱ्या राजकीय भूमिकांमुळे स्थानिक पातळीवर काँग्रेस पक्षाचे मोठे नुकसान होत आहे. त्यांच्या या धरसोड वृत्तीचा थेट फायदा भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि महायुतीतील इतर पक्षांना मिळत आहे.

## धायरेश्वर मंदिर परिसरातील कचऱ्याच्या साम्राज्याला जबाबदार कोण?




**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी परिसरातील धायरेश्वर मंदिराजवळ महापालिकेची आरोग्य कोठी असतानाही मोठ्या प्रमाणावर अवजड व टाकाऊ कचरा टाकला जात असल्याने परिसरात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. गाद्या, थर्माकोल, प्लास्टिक, कपडे, घरगुती टाकाऊ साहित्य, माती तसेच इतर घनकचऱ्याचे ढिगारे दिवसेंदिवस वाढत आहेत.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, बाहेरील व्यक्तींकडून प्रति ट्रॉली तीन ते चार हजार रुपये घेऊन हा कचरा येथे आणून टाकला जात असल्याचा आरोप आहे. हा प्रकार खरा असल्यास कचरा व्यवस्थापनासोबतच महापालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होते. आरोग्य कोठी जवळ असतानाही प्रशासनाच्या नजरेसमोर एवढ्या मोठ्या प्रमाणावर कचरा जमा कसा होतो, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. कचरा आणणाऱ्या वाहनांवर कारवाई का होत नाही? संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे याकडे लक्ष का नाही? प्रशासनाच्या नाकावर टिच्चून हा प्रकार सुरू राहणे गंभीर बाब असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. धायरेश्वर मंदिर परिसराला धार्मिक तसेच पर्यावरणीय महत्त्व आहे. कचऱ्यामुळे दुर्गंधी, डास-माशांचा प्रादुर्भाव आणि नागरिकांना आरोग्यविषयक त्रास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेने केवळ कचरा उचलण्यापुरती कारवाई न करता या प्रकारामागील व्यक्तींचा शोध घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

योग्य नियोजन आणि इच्छाशक्ती असल्यास याच जागेचे सुशोभीकरण करून गार्डन, हिरवाई आणि तलावाच्या माध्यमातून नागरिकांसाठी आकर्षक सार्वजनिक ठिकाण विकसित करता येऊ शकते. कचरा कोण आणतो, कोण पैसे घेतो आणि हा प्रकार कोणाच्या परवानगीने अथवा दुर्लक्षामुळे सुरू आहे, याची सखोल चौकशी करावी. कचरा टाकणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करून परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत तसेच नियमित गस्त ठेवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते महेश पोकळे यांनी महापालिका प्रशासनाला तातडीने कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. धायरेश्वर मंदिर परिसर कचराकुंडी बनवण्यासाठी नसून, तो स्वच्छ, सुंदर आणि नागरिकांसाठी उपयोगी सार्वजनिक परिसर म्हणून विकसित झाला पाहिजे. प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा पोकळे यांनी दिला.

## ग्रेटर नोएडात २५ एकरवर आयटीएलचे जागतिक संशोधन-विकास केंद्र



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीचा निर्यात ब्रँड आणि ‘सोनालिका ट्रॅक्टर्स’चा प्रमुख ब्रँड असलेल्या इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडने उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडा येथे २५ एकर जागेवर जागतिक संशोधन आणि विकास केंद्र उभारण्याची घोषणा केली आहे. भविष्यासाठी सज्ज तंत्रज्ञान आणि शेतकरी-केंद्रित नवकल्पना विकसित करण्यासाठी हे केंद्र जागतिक दर्जाचे प्रगत अभियांत्रिकी केंद्र म्हणून विकसित केले जाणार आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि आयटीएलच्या व्यवस्थापनामध्ये लखनौ येथे झालेल्या बैठकीनंतर या केंद्राच्या उभारणीचा निर्णय घेण्यात आला. कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाला चालना देण्यासोबतच भारतासह जागतिक बाजारपेठांच्या गरजा लक्षात घेऊन अत्याधुनिक कृषी उत्पादने विकसित करण्यावर या केंद्राचा भर राहणार आहे.

आयटीएलच्या ‘जीतने का दम’ या संकल्पनेतून कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्याच्या तीन दशकांच्या प्रवासातील हे पुढचे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. या केंद्राच्या माध्यमातून अभियांत्रिकी कौशल्य आणि शेतकऱ्यांकडून मिळणारा प्रत्यक्ष प्रतिसाद यांची सांगड घालून भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठांसाठी अत्याधुनिक कृषी उत्पादने विकसित केली जाणार आहेत. या नव्या हरितक्षेत्र सुविधेमुळे उच्च-मूल्य अभियांत्रिकी, कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती आणि तंत्रज्ञानाधारित औद्योगिक प्रगतीला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. उत्तर प्रदेशातील वाढत्या तंत्रज्ञान आणि औद्योगिक परिसंस्थेतही हे केंद्र महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे सहव्यवस्थापकीय संचालक रमण मित्तल म्हणाले, “उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची भेट घेऊन ग्रेटर नोएडा येथे आयटीएलच्या प्रस्तावित २५ एकर जागतिक संशोधन आणि विकास केंद्राची संकल्पना सादर करणे ही आमच्यासाठी सन्मानाची बाब आहे. कृषी क्षेत्रातील नवोन्मेषाच्या पुढील टप्प्याला आकार देण्याच्या दृष्टीने हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

## अक्कलकोटकर रत्नांचा पुण्यात होणार सन्मान सोहळा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अक्कलकोट तालुक्याचे नाव विविध क्षेत्रांत उज्ज्वल करणाऱ्या आणि पुणे शहरात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या अक्कलकोटकरांचा सन्मान करण्यासाठी गावगाथा मीडिया नेटवर्कच्या वतीने ‘अक्कलकोट रत्न पुरस्कार सोहळा–२०२६’ आयोजित करण्यात आला आहे. हा सन्मान सोहळा शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत स्वारगेट येथील नितू मांडके सभागृहात होणार आहे. या सोहळ्यास अक्कलकोटचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, पुणे उपमहापौर परशुराम वाडेकर तसेच निवृत्त आयएएस अधिकारी शेखर गायकवाड ,अमितेश कुमारपोलीस आयुक्त पुणे,यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या वेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. अक्कलकोट भूषण पुरस्काराने श्रीमंत जन्मेजयराजे भोसले महाराज (अध्यक्ष, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट), मल्लिनाथ कल्लशेट्टी (माजी जिल्हाधिकारी), माधव राजगुरू (ज्येष्ठ साहित्यिक) आणि शरणकुमार निंबाळे (ज्येष्ठ साहित्यिक) यांचा सन्मान करण्यात येणार आहे. तसेच पौर्णिमाताई गायकवाड (आयपीएस), बंडोपंत कुलकर्णी (जिल्हा न्यायाधीश, पुणे), महेश बोळकोटगी (पोलीस निरीक्षक), रविकांत पाटील (सहकार व साखर उद्योग क्षेत्र), गणेश फुलारी (उद्योजक), वीरभद्र हारकूड (अध्यक्ष, पुणे अक्कलकोट रहिवासी मंच), संजीवकुमार हिळ्ळी (सिने छायाचित्रकार), चंद्रशेखर भांगे (पत्रकार, लोकशाही न्यूज), सिद्धार्थ कापसे (युवा उद्योजक), डॉ. अमोगसिद्ध शिवाजी चेंडके (मराठी भाषा व संतसाहित्य अभ्यासक) आणि ॲड. सदाशिव माळगे यांना ‘अक्कलकोट रत्न’ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# नऱ्हे गोकुळनगर ते किरण अपार्टमेंट मार्गावर पावसाळी लाईनचे काम लवकरच

## नगरसेविका सौ. कोमल नवले यांच्या पाठपुराव्यास यश





दैनिक आरंभपर्व

12 Jul 2026 - Page 4

अनेक वर्षापासून रस्त्यावरच वाहते पाणी; स्टॉर्म वॉटर ड्रेनेजची गरज

पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)

सिंहगड रस्त्यालगतच्या प्रभाग क्रमांक ३४ मधील नऱ्हे परिसरात पर्जन्यजल निचरा वाहिनी स्टॉर्म वॉटर ड्रेनेज नसल्यामुळे प्रत्येक पावसाळ्यात मुख्य रस्ते तसेच अंतर्गत मार्गांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. यामुळे वाहनचालक, पादचारी, शालेय विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून नागरिकांनी प्रशासनाकडे कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी केली आहे.

गेल्या काही वर्षांत नऱ्हे परिसरात झपाट्याने नागरीकरण झाले आहे. अनेक गृहनिर्माण सोसायट्या, व्यावसायिक संकुले आणि वाढती लोकसंख्या यामुळे वाहतुकीची वर्दळही वाढली आहे. मात्र, या वाढत्या विकासाच्या तुलनेत पर्जन्यजल निचऱ्याची आवश्यक सुविधा उभारण्यात आलेली नसल्याने मुसळधार पावसात पाणी थेट रस्त्यावर साचते आणि अनेक ठिकाणी जलसाठे निर्माण होतात. रस्त्यांवर साचलेल्या पाण्यामुळे खड्डे दिसत नसल्याने दुचाकीस्वार घसरून अपघात होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. तसेच वाहतूक कोंडी, पादचाऱ्यांची गैरसोय आणि व्यावसायिकांचे आर्थिक नुकसानही होत आहे. काही ठिकाणी पाणी घरांच्या आवारात तसेच दुकानांमध्ये शिरत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पावसाळ्यापूर्वी नालेसफाई केली जात असली तरी स्वतंत्र पर्जन्यजल निचरा व्यवस्था नसल्यामुळे हा प्रश्न कायम राहतो. त्यामुळे केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर न थांबता संपूर्ण नऱ्हे परिसरासाठी नियोजनबद्ध स्टॉर्म वॉटर ड्रेनेज प्रकल्प राबविण्याची गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे.

पुणे महानगरपालिका तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन पर्जन्यजल निचरा वाहिनीचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. अन्यथा प्रत्येक पावसाळ्यात नऱ्हेकरांना याच समस्येला सामोरे जावे लागणार असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली आहे.

“नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा सुरू राहणार असून, परिसरातील नागरिकांना सुरक्षित आणि सुकर वातावरण मिळावे यासाठी प्राधान्याने काम केले जाईल. इतर भागातही पावसाळी लाईनची मंजुरी मिळाल्यानंतर काम सुरू करण्यात येईल”

**- सौ. कोमल सारंग नवले, नगरसेविका पुणे मनपा**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिवपार्वती मंगल कार्यालय, गोकुळनगर ते किरण अपार्टमेंट या मार्गावरील पावसाळी पाण्याच्या निचऱ्याचा प्रश्न आता मार्गी लागणार आहे. पावसाळी लाईन टाकण्यासाठी आवश्यक पाईप उपलब्ध झाले असून, येत्या काही दिवसांत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून या मार्गावर पावसाचे पाणी रस्त्यावर साचत असल्याने नागरिकांना वाहतूक व रहदारीचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. काही घरांमध्ये पाणी शिरत असल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून करण्यात आल्या होत्या. या प्रश्नावर स्थानिक नगरसेविका सौ .कोमल सारंग नवले यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करून पावसाळी लाईनचे काम तातडीने हाती घेण्याची मागणी करण्यात आली होती. या पाठपुराव्याला यश आले असून, आवश्यक पाईप उपलब्ध झाल्याने लवकरच काम सुरू होणार आहे.

“गोकुळनगर नऱ्हे ते किरण अपार्टमेंट परिसरातील नागरिकांना पावसाळ्यात होणारा त्रास लक्षात घेऊन पावसाळी लाईनचे काम मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. आता आवश्यक पाईप उपलब्ध झाले असून, लवकरच प्रत्यक्ष काम सुरू होणार आहे. या कामामुळे नागरिकांची गैरसोय दूर होऊन पाण्याचा निचरा सुरळीत होण्यास मदत होणार आहे. पावसाळी लाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यावर साचणारे पाणी तसेच काही घरांमध्ये पाणी शिरण्याची समस्या कमी होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

रस्त्यावर वाहणाऱ्या पाण्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास होत होता. याबाबत **१२ जुलैच्या अंकामध्ये दैनिक आरंभपर्वने** हे वृत्त प्रकाशित केले होते. त्यावेळी मनपा प्रशासनाकडून ही कार्यवाही करण्याचे संकेत देण्यात आले होते. अखेर नगरसेविका सौ. कोमल नवले यांच्या माध्यमातून हा प्रश्न सुटत आहे. त्यामुळे नागरिकांना एक दिलासा मिळाला आहे.

**नवले ब्रिजवरील ब्रेक फेल अपघात रोखण्यासाठी**

## अक्षय इंगळे यांचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना निवेदन

- नऱ्हे गावचे माजी उपसरपंच अक्षय सुभाष इंगळे यांचा पुढाकार
- नगरसेवक रविंद्र साळेगावकर यांच्या पत्राद्वारे मागणी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवले ब्रिज येथे ब्रेक फेलमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी नऱ्हे गावचे माजी उपसरपंच अक्षय सुभाष इंगळे यांनी पुढाकार घेतला आहे. नगरसेवक रविंद्र साळेगावकर यांच्या पत्राद्वारे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री मा. नितीनजी गडकरी यांच्याकडे याबाबत निवेदन सादर करण्यात आले आहे.

नवले ब्रिज परिसरात ब्रेक फेल होणे अथवा वाहनावरील नियंत्रण सुटल्यामुळे वारंवार गंभीर अपघात घडत आहेत. या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थितीत वाहन सुरक्षितपणे थांबविण्यासाठी ‘रनअवे / एस्केप रॅम्प’ उभारण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

ही संकल्पना सर्वप्रथम अक्षय सुभाष इंगळे यांनी पुणे महानगरपालिकेकडे मांडली होती. त्यानंतर या मागणीचा पाठपुरावा करत नगरसेवक रविंद्र साळेगावकर यांच्या माध्यमातून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निवेदन देण्यात आले.

या मागणीची दखल घेत नितीन गडकरी यांनी याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे नवले ब्रिजवरील अपघात रोखण्यासाठी ‘रनअवे / एस्केप रॅम्प’ उभारण्याच्या मागणीला आता केंद्रस्तरावरून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जलपर्णी काढण्याच्या टेंडरविरोधात महापालिकेसमोर तीव्र आंदोलन

पुणे (आरंभ पर्व) : पुणे शहरातील विविध रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले असताना नागरिकांच्या सुरक्षिततेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पुणे महानगरपालिकेसमोर तीव्र आंदोलन व निदर्शने करण्यात आली. पावसाळ्यात नदीला पाणी सोडण्यात आल्यानंतर नदीपात्रातील जलपर्णी वाहून गेली असतानाही जलपर्णी काढण्यासाठी महापालिकेने टेंडर काढले असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. नागरिकांच्या कररूपी पैशांचा अपव्यय थांबवावा आणि संबंधित टेंडर तातडीने रद्द करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. शहरातील रस्त्यांवरील खड्डे, नागरिकांच्या जीवितास निर्माण झालेला धोका आणि जलपर्णी काढण्याच्या टेंडरच्या मुद्द्यावर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. या आंदोलनावेळी शहराध्यक्ष श्रीकांत पाटील, गटनेते काकासाहेब चव्हाण, नगरसेविका अनिता इंगळे, नगरसेवक गफूरभाई पठाण, युवक शहराध्यक्ष किशोर कांबळे, महिला शहराध्यक्ष स्वाती पोकळे, खडकवासला विधानसभा ग्रामीण अध्यक्ष त्र्यंबक मोकाशी, कार्याध्यक्ष सुरेश गुजर, खडकवासला विधानसभा युवक अध्यक्ष अतुल बबनराव धावडे (पाटील), माजी अध्यक्ष शरद दबडे, युवा नेते अतुल दांगट पाटील, माजी सरपंच विकास दांगट पाटील यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### नागपुरमध्ये देशभरातील तज्ज्ञ एकत्र येणार

नागपूर (आरंभ पर्व) : मधुमेह, लठ्ठपणा आणि त्यातून होणाऱ्या आरोग्याच्या समस्यांचे प्रमाण वाढत असताना दोस्ती (डायबिटीज ओबेसिटी सोसायटी ट्रान्सफॉर्मेशन इनिशिएटिव्ह) तर्फे दोस्तीकॉन 2026 – राष्ट्रीय डायबेसिटी परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे. ही परिषद 22 आणि 23 ऑगस्ट 2026 रोजी हॉटेल रेजेंटा सेंट्रल, जगनाडे चौक, नागपूर येथे होणार आहे. या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदची थीम “गुडबाय डायबेसिटी, गुडबाय डायबेटिक फूट” म्हणजेच “डायबेसिटीला निरोप, डायबेटिक फूटला निरोप” अशी आहे. देशभरातील डॉक्टर, वैद्यकीय तज्ज्ञ आणि राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ या परिषदेत सहभागी होणार आहेत. मधुमेह, लठ्ठपणा, डायबेटिक फूट (मधुमेहामुळे पायांवर होणाऱ्या गंभीर समस्या) आणि चयापचयाशी संबंधित आरोग्य समस्यांवरील आधुनिक उपचार पद्धती आणि नवीन माहितीवर यावेळी चर्चा होणार आहे. या परिषदेचे आयोजन दोस्ती (डायबिटीज ओबेसिटी सोसायटी ट्रान्सफॉर्मेशन इनिशिएटिव) यांच्या वतीने करण्यात येत आहे. या आयोजनाला इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA), असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडिया (API), इंडियन पोडियाट्री असोसिएशन, अजमेरू डायबिटीज सोसायटी आणि डायबेटिक असोसिएशन ऑफ इंडिया यांचे सहकार्य लाभले आहे. यासोबतच इंटरनॅशनल डायबिटीज एक्सपर्ट्स कन्सोर्टियम (IDEC), पुणे हे देखील या आयोजनाला सहकार्य करत आहे. आयोजन समितीमध्ये डॉ. अजय कडूसकर, आयोजन सह-अध्यक्ष, दोस्तीकॉन 2026; डॉ. अभिषेक पांडे, आयोजन सह-अध्यक्ष; आणि डॉ. केदार देशपांडे, आयोजन सचिव, दोस्तीकॉन 2026 यांचा समावेश आहे.

### नागपूर पदवीधर मतदारसंघासाठी भाजपची मोर्चेबांधणी




नागपूर (आरंभ पर्व) : नागपूर पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी विदर्भाचा दोन दिवसीय झंझावाती दौरा करत संघटनात्मक बैठकांच्या माध्यमातून निवडणुकीच्या तयारीला वेग दिला. त्यांच्या या दौऱ्यानंतर आता भाजपची संघटनात्मक यंत्रणा नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी पूर्ण ताकदीने मैदानात उतरली आहे. या दोन दिवसीय दौऱ्यादरम्यान रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये नागपूर ग्रामीण (रामटेक), चंद्रपूर महानगर व ग्रामीण, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर महानगर, काटोल आणि वर्धा या संघटनात्मक जिल्ह्यांच्या बैठका घेण्यात आल्या. या बैठकांमध्ये संघटनात्मक बांधणी, निवडणूक नियोजन आणि कार्यपद्धतीचा आढावा घेत चव्हाण यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संघटित आणि नियोजनबद्ध पद्धतीने निवडणूक लढवण्याचे मार्गदर्शन केले. चंद्रपूरमध्ये झालेल्या बैठकीदरम्यान ब्रह्मपुरी येथील, १९८० पासून पक्षकार्यासाठी समर्पित असणाऱ्या प्रा. शेख सर यांचा चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. "प्रा. शेख सर यांच्यासारखे देवदुर्लभ कार्यकर्ते हे भाजपा परिवाराचे खरे आधारस्तंभ आहेत. अशा निष्ठावंत ज्येष्ठांच्या संघर्षातूनच आज पक्षाचा हा भव्य वटवृक्ष साकार झाला आहे." असे यावेळी रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.

### पांढरेवाडीत एकल महिलेच्या हस्ते ध्वजारोहण




दौंड (आरंभ पर्व) : पांढरेवाडी ग्रामपंचायतीने आपला परिवर्तनवादी विचार जपत,महिलास्नेही ग्रामपंचायतीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून एकल महिलेच्या हस्ते ध्वजारोहण करण्याचा निर्णय घेतला,जयश्री जिजाबा जगताप या एकल महिलेच्या हस्ते ध्वजारोहण करून महिलासन्मानाचा एक नवा मानबिंदू जपला आहे.यावेळी सरपंच सौ.नीता कोंडे,अमर गायकवाड, राजेंद्र भागवत,ग्रामपंचायत अधिकारी स्वाती लोंढे, तलाठी संदीप जंजीर, पोलिस पाटील विलास येचकर,स्वाती शितोळे, तुषार भागवत, धनसिंग जाधव सर शिक्षकवृंद, अंगणवाडीसेविका व ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच जिल्हा परिषदेतील ध्वजारोहण शारदा प्रताप निबांळकर या एकल महिलेच्या हस्ते करण्यात आले.यावेळी बोलताना सरपंच सौ. नीता कोंडे म्हणाल्या की, स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करत असताना एकल महिलांचा सन्मान जपणं ही सर्व समाजघटकांची जबाबदारी आहे,पांढरेवाडी ग्रामपंचायतीने हे महत्वाचे पाऊल उचलत एकल महिलांचा सन्मान केला आहे. यावेळी ग्रामपंचायतीने कचरा संकलनासाठी घेतलेल्या ट्रॅक्टरचे लोकार्पण करण्यात आले.

## श्रीक्षेत्र नामयज्ञ सोहळा ट्रस्टच्यावतीने

# पांडुरंगाच्या महाद्वारी ‘नामयज्ञ सोहळा’




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

श्रीक्षेत्र नामयज्ञ सोहळा ट्रस्ट यांच्या वतीने चातुर्मासातील श्रावणी मासामध्ये श्रीक्षेत्र पंढरपूर येथे विठ्ठलाचे महाद्वार वीणा मंडपात 'नामयज्ञ सोहळा' हरिनामाच्या गजरात उत्साहात पार पडला. या सोहळ्याचे आयोजन श्री विठ्ठल प्रासादिक भजनी मंडळ, श्री शिवशंकर सांप्रदायिक भजनी मंडळ आणि पंचक्रोशी वारकरी संप्रदाय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

पहाटे काकडा आरती, नामस्मरण, प्रवचन, हरिपाठ, हरिजागर आणि सकाळी आणि सायंकाळी हरिकीर्तन असे सोहळ्याचे स्वरूप होते. ह.भ.प. सदाशिव महाराज बैकर, चंद्रकांत महाराज मांडवकर, जगन्नाथ महाराज सकपाळ, सुधाकर महाराज बगडे, दत्ताराम महाराज आयरे, अक्षय महाराज मते, काल्याचे कीर्तन निवृत्ती महाराज मुकनाक यांचे झाले. ह.भ.प. प्रवीण महाराज भागडे, महादेव महाराज जाबरे आणि प्रकाश महाराज सोलकर यांचे प्रवचन झाले.

यावेळी श्रीसंत नामदेव महाराजांचे सोळावे वंशज ह.भ.प. माधव महाराज नामदास (पंढरपूर) यांच्या हस्ते 'श्री संत सेवा गौरव पुरस्कार' ह.भ.प. दत्ताराम महाराज आयरे (चिपळूण) आणि ह.भ. प. शंकर महाराज भारदे (दापोली) यांना प्रदान करण्यात आला. शंकर महाराज भारदे म्हणाले, मला अनेक पुरस्कार मिळाले परंतु अध्यात्म आणि समाज प्रबोधनातून हा मिळालेला 'संत सेवा पुरस्कार' माझ्यासाठी सर्वश्रेष्ठ आहे.

*पंढरीचा महिमा ।।*
*देता आणीक उपमा ।।*
*ऐसा ठाव नाहीं कोठें ।*
*देव उभाउभी भेटे ।।*
*आहेति सकळ ।*
*तीर्थे काळें देती फळ ।।*
*तुका म्हणे पेठ ।*
*भूमिवरी हे वैकुंठ ।।*

तुकाराम महाराजांनी अभंगात म्हटल्याप्रमाणे या भूवरील वैकुंठाचा निरोप घेताना सर्व भाविकांचे डोळे पाण्याने भरून आले होते.

कार्यक्रमाचे हे पाचवे वर्ष असून तीन हजार जणांनी या नामयज्ञ सोहळ्याचा लाभ घेतला. रामकृष्ण हरीच्या ठेक्यात आणि टाळ-मृदंगाच्या तालावर पावल्या तर महिला भाविकांनी फुगड्या खेळून आनंदोत्सव साजरा केला. सर्व विठ्ठलभक्त भक्तिरसात न्हाऊन निघाले. सोहळ्यात महिला वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सत्कार आणि स्वागत श्रीक्षेत्र नामयज्ञ सोहळा ट्रस्टचे अध्यक्ष ह.भ.प. निवृत्ती महाराज मुकनाक आणि उपाध्यक्ष काशिनाथ महाराज शिगवण यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद महाराज राणे यांनी केले. आभार जगन्नाथ महाराज सकपाळ यांनी मानले.

## राजवीर राजीव पाटीलचा गौरव

### पुणे महानगरपालिकेचा १५ ऑगस्टनिमित्त पुरस्कार प्रदान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बालकलाकार राजवीर राजीव पाटील याला कलाक्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल पुणे महानगरपालिकेच्या वतीने १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनानिमित्त देण्यात येणारा पुरस्कार आज प्रदान करण्यात आला. महापौर मंजुषाताई नागपूरे यांच्या हस्ते राजवीरचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. लहान वयातच अभिनय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राजवीरने विविध कलाकृतींमध्ये आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. त्याच्या या कलात्मक कामगिरीची दखल घेत पुणे महानगरपालिकेच्या वतीने त्याचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक राजाभाऊ बराटे, नगरसेविका रेश्मा संतोष बराटे तसेच विरोधी पक्षनेते निलेशभैय्या निकम यांची उपस्थिती होती. लहान वयात मिळालेला हा सन्मान राजवीरच्या पुढील कलाप्रवासासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. त्याच्या या यशाबद्दल उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नगरसेवक भारतभूषण शरदआबा बराटे यांच्या विशेष प्रयत्नातून राजवीर राजीव पाटील याला हा पुरस्कार मिळाला.

## १४ तासांत ५१ रोबोटिक बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया

डॉ. मोहित भंडारी आणि टीम मोहकचा विक्रमाचा दावा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत डॉ. मोहित भंडारी आणि टीम मोहक यांनी १५ ऑगस्ट रोजी अवघ्या १४ तासांत ५१ रोबोटिक बॅरिएट्रिक आणि मेटाबोलिक शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्याचा दावा केला आहे. या उपक्रमात सहा रोबोटिक प्रणाली, एक नियुक्त कन्सोल सर्जन आणि अत्यंत समन्वयित भारतीय वैद्यकीय पथक सहभागी झाले होते. या उपक्रमासाठी व्यापक नियोजन, प्रमाणित शस्त्रक्रिया पद्धती, शल्यचिकित्सक, भूलतज्ज्ञ, परिचारिका आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांमधील समन्वय तसेच सलग १४ तास गुणवत्तापूर्ण शस्त्रक्रिया करण्याची क्षमता आवश्यक होती. एकूण ५१ रुग्णांवर या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यामध्ये ३० पुरुष आणि २१ महिलांचा समावेश असून, रुग्णांचे वय २१ ते ७७ वर्षे होते. रुग्णांचे सरासरी वय ४३.६ वर्षे आणि सरासरी वजन सुमारे १२२ किलो होते. डॉ. मोहित भंडारी यांनी आतापर्यंत ४० हजारांहून अधिक बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया केल्याचे सांगण्यात आले. या पार्श्वभूमीवर ५१ रुग्णांवर एकाच उपक्रमात करण्यात आलेल्या रोबोटिक बॅरिएट्रिक आणि मेटाबोलिक शस्त्रक्रिया त्यांच्या व्यापक अनुभवाचे आणि टीमच्या कार्यक्षमतेचे उदाहरण मानले जात आहे. या प्रयत्नाची बाह्य देखरेख करण्यात आली असून, औपचारिक मान्यतेसाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स आणि वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्सकडे आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

## निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांचा सन्मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत मेडीकव्हर हॉस्पिटल, भोसरी यांच्या वतीने पुणे शहरातील सुमारे ८० निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. देशाच्या सुरक्षेसाठी आणि सेवेसाठी योगदान देणाऱ्या माजी सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला मेडीकव्हर हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉ. व्यास मौर्य, अमोल मुळे, शुभम काळे आणि डॉ. पूजा निंबाळकर उपस्थित होते. तसेच एक्स-सर्व्हिसमेन डेव्हलपमेंट असोसिएशन, दिघी, पुणेचे अध्यक्ष कॅप्टन भास्कर आंब्रे आणि संयुक्त सचिव तसेच दिघीचे नगरसेवक कॅप्टन कृष्णा सुरुकुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## पुण्याच्या पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तातडीने उपाययोजना करा : नगरसेवक हरिदास चरवड



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहराचा झपाट्याने होत असलेला विकास आणि वाढत्या बांधकामांमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असून, शहरातील नैसर्गिक जलस्रोत, नद्या आणि हिरवाईचे संवर्धन करण्यासाठी महापालिकेने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नगरसेवक हरिदास चरवड यांनी पुणे महापालिकेच्या मुख्य सभेत केली. महापालिकेच्या पर्यावरण सद्यस्थिती अहवालावर झालेल्या चर्चेदरम्यान चरवड यांनी शहरातील पर्यावरणीय प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. सांडपाण्यामुळे नद्यांचे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी सांडपाण्यावर प्रभावी प्रक्रिया करणे आवश्यक आहे. तसेच शहरातील एसटीपी प्लांट, आरएमसी प्लांट आणि स्टोन क्रशर यांसारखे प्रदूषणास कारणीभूत ठरणारे प्रकल्प शहराबाहेर हलविण्याची मागणी त्यांनी केली.

पुणे शहरातील दोन्ही कॅनॉलच्या परिसरात ‘ग्रीन कॉरिडॉर’ तसेच बफर झोन विकसित केल्यास शहरातील हरित क्षेत्र वाढण्यास आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल, असे चरवड यांनी सांगितले. वाढत्या बांधकामांमुळे नैसर्गिक जलस्रोत आणि मोकळ्या जागांवर होणारा परिणाम लक्षात घेऊन यूडीसीपीआर नियमांचा पुनर्विचार करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. तलाव, नद्या, नाले आणि इतर नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धन करण्याबरोबरच शहरातील वृक्षसंपदा वाढविण्यावरही महापालिकेने भर द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. पुणे शहराला स्वच्छ हवा, स्वच्छ नद्या आणि हिरवेगार पर्यावरण मिळण्यासाठी प्रशासनाने तातडीने कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन चरवड यांनी केले.

“स्वच्छ नाले, निरोगी शहर, सुरक्षित पर्यावरण—हाच खरा विकास. आजचे पाऊल उद्याचे भविष्य वाचवेल,” असा संदेश देत त्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची मागणी केली.

## गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीतील स्पीकरवरील निर्बंध मागे घ्या

युवासेना महानगरप्रमुख हेमंत बागुल यांची पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे मागणी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्याच्या ऐतिहासिक व पारंपरिक सार्वजनिक गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीमध्ये स्पीकर लावण्याबाबत पोलीस प्रशासनाने घातलेले निर्बंध मागे घेण्यात यावेत, अशी मागणी पुणे महानगर प्रमुख हेमंत आबा बागुल यांनी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सव हा धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक एकात्मतेचे प्रतीक असून, विसर्जन मिरवणूक हा या उत्सवाचा प्रमुख आकर्षणाचा भाग आहे. ही मिरवणूक तब्बल २४ ते ३० तास चालते. लाखो भाविक या मिरवणुकीत सहभागी होत असतात. गर्दी, सुरक्षितता आणि वाहतुकीचे नियोजन करताना पुणे पोलीस दलाकडून दरवर्षी महत्त्वाची भूमिका बजावली जाते. पोलीस प्रशासनाच्या सहकार्यामुळेच विसर्जन सोहळा शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडतो, असे बागुल यांनी निवेदनात नमूद केले.

यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाच्या विविध बैठका झाल्या आहेत. मात्र, विसर्जन मिरवणुकीमध्ये स्पीकर लावण्याबाबत निर्बंध घालण्याचा निर्णय घेण्यापूर्वी पुण्यातील सर्व गणेश मंडळांना विश्वासात घेणे आवश्यक होते, असे बागुल यांनी म्हटले आहे.

अनेक गणेश मंडळांनी यंदाच्या विसर्जन मिरवणुकीसाठी स्पीकरचे बुकिंग आधीच केले असून, मंडळांचे सर्व कार्यक्रम लोकवर्गणीतून आयोजित केले जातात. त्यामुळे अचानक निर्बंध लागू केल्यास मंडळांसमोर अडचणी निर्माण होणार आहेत. पोलीस प्रशासनाने गणेश मंडळांची भूमिका जाणून घेऊन निर्णय घ्यावा आणि एकतर्फी लादण्यात आलेले स्पीकरवरील निर्बंध तातडीने मागे घ्यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी अविनाश खेडेकर, ओमकार आढाव, अनिराज कुऱ्हाडे, विशाल लोखंडे, विशाल सरोदे, अक्षय फुलसुंदर, कार्तिक परदेशी, विशाल सूर्यवंशी, मंगेश चव्हाण, देवेंद्र सुतार, सिद्धेश कामठे, अतुल शेलार, आबा लोखंडे यांच्यासह युवा सैनिक आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## भटक्या कुत्रे व भटक्या जनावरांचा बंदोबस्त करा : सरपंच राहुल चाबुकसार



**दौंड (दै. आरंभ पर्व)**

ग्रामपंचायत कानगाव हद्दीमध्ये भटके कुत्रे व मोकाट जनावरे यांचा उपद्रव वाढलेला असून त्यांच्यापासून ग्रामस्थांना त्रास होत आहे तसेच सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे गावातील मुख्य रस्ते शाळा परिसर अंगणवाडी परिसर सार्वजनिक ठिकाणे नागरिकांची मोठी वर्दळ असते याच परिसरात भटके कुत्रे मोकळ जाणारे फिरत असल्याचे निदर्शनास येत आहे विशेष म्हणजे लहान मुले शाळकरी विद्यार्थी महिला जेष्ठ नागरिक यांना मोठा धोका निर्माण झाला आहे तसेच मोकाट जनावरे रस्त्यावर बसत असल्याने वाहतुकीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे अशा प्रकारामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही भविष्यात कोणत्याही प्रकारे गंभीर दुर्घटना घडू नये यासाठी उपाय योजना करणे अत्यंत गरजेचे आहे, संबंधित विभागाशी समन्वय साधून भटक्या कुत्रे व मोकळा जनावराची आवश्यक तशी कारवाई करावी अशा प्रकारची मागणी दौंड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा कानगाव गावचे प्रशासक सरपंच राहुल चाबुकस्वार यांनी दौंड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अरुण मरभळ यांच्याकडे लेखी स्वरूपात मागणी केली आहे यावर गट विकास अधिकारी काय भूमिका घेतात याकडे कानगावकरांचे लक्ष लागले आहे.

## नायगाव येथे ८० वा स्वातंत्र्यदिन साजरा



**लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (दै. आरंभ पर्व)**

आज वार शनिवार, दिनांक १५-०८-२०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नायगाव, ता. हवेली येथे ८० वा स्वातंत्र्य दिन सोहळा देशभक्तीचा उत्साह, विद्यार्थ्यांचा जल्लोष आणि संस्कृतीच्या रंगांची उधळण करत अत्यंत दिमाखदार वातावरणात संपन्न झाला. यावेळी आकर्षक रांगोळी आणि विविधरंगी फुग्यांनी सारा परिसर सजविण्यात आला होता. प्रथम विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी काढलेली प्रभातफेरी देशभक्तीच्या घोषणांनी दुमदुमून गेली. तदनंतर ग्रामपंचायत कार्यालयासमोरील ध्वजारोहण कार्यक्रम उपस्थित मान्यवर, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांसमवेत साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिनानिमित्त तंबाखूमुक्त शपथ, महिला सुरक्षा विषयक शपथ आणि असाक्षर मुक्त गावाची शपथ घेण्यात आली. यानंतर शाळेतील ध्वजारोहण सोहळा पार पडला. यावेळी ध्वजपूजन शाळेच्या बालसंसदेचे विरोधी पक्षनेते निर्भय मेमाणे आणि ध्वजारोहण मुख्यमंत्री कु. अनुष्का मुसळे यांनी केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी केलेल्या संगीत कवायत, संगीतमय लेझीम आणि भाषणांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरले ते शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षक यांचा बक्षीस देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना देशभक्तीच्या प्रेरणा दिल्या.

## जाधवर स्कूलसमोरील आरएमयू बॉक्स व ग्रीनलँड काउंटीतील

# विद्युत डीपीचा प्रश्न लवकरच सुटणार





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जाधवर स्कूलसमोरील रस्त्यावर असलेल्या आरएमयू बॉक्समुळे वाहतुकीस निर्माण होणारा अडथळा तसेच ग्रीनलँड काउंटी सोसायटीसमोरील विद्युत डीपी स्थलांतराचा प्रश्न लवकरच मार्गी लागण्याची शक्यता आहे. या दोन्ही प्रश्नांसंदर्भात महावितरणचे कार्यकारी अभियंता विनोद राणे यांनी आज सकाळी १०.३० वाजता अभिरुची परिसरातील संबंधित ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी जाधवर स्कूलसमोरील आरएमयू बॉक्स तसेच ग्रीनलँड काउंटी सोसायटीसमोरील विद्युत डीपीची पाहणी करण्यात आली. आरएमयू बॉक्समुळे वाहतुकीस होणारा अडथळा लक्षात घेऊन पथ विभागाशी समन्वय साधत हा बॉक्स योग्य ठिकाणी स्थलांतरित करण्याचे आश्वासन कार्यकारी अभियंता विनोद राणे यांनी दिले. आरएमयू बॉक्सचे स्थलांतर झाल्यास परिसरातील वाहतुकीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होणार असून, नागरिकांना होणारा त्रासही कमी होणार आहे. त्यामुळे या प्रश्नावर लवकरच सकारात्मक कार्यवाही होऊन विद्युत यंत्रणेची ही समस्या कायमस्वरूपी मार्गी लागेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या प्रश्नासाठी आपल्या हक्काचा रस्ता संघर्ष समितीचे रोहिदास जोरी यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यांच्या पाठपुराव्यामुळे प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. मात्र, समस्या लवकर सुटली नाही तर आंदोलन करण्याचा इशाराही जोरी यांनी दिला आहे.

दरम्यान, सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे पोलीस निरीक्षक राहुल गौड यांनीही वाहतुकीच्या दृष्टीने या प्रश्नाची दखल घेत महावितरण प्रशासनाला पत्र दिले आहे. महावितरण, पथ विभाग आणि पोलीस प्रशासन यांच्या समन्वयातून जाधवर स्कूलसमोरील आरएमयू बॉक्स तसेच ग्रीनलँड काउंटीसमोरील विद्युत डीपीचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.